रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३०७
www.ramprahar.com
◆ मंगळवार, २६ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

भरडखोल येथील बंदरामुळे मच्छीमारांचा उत्कर्ष/२
मोदी सरकारच्या तपपूर्तीनिमित्त लेख/४
अनुराज ठाकूरची रायगड खो-खो संघात निवड/८

## पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील व्हीआयपी दर्शन बंद



**पंढरपूर :** अधिक मासानिमित्त चंद्रभागा स्नान आणि विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी भाविक लाखोंच्या संख्येने पंढरीत येत आहेत. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता दर्शन रांग व मंदिर परिसरात शेडनेट उभारून सावली तयार करण्यात आली आहे, तर दर्शन रांगही वॉटरप्रूफ बनविण्यात आली आहे. यामुळे दर्शन रांगेत थांबून भाविक दर्शन घेत आहेत. भाविकांना सुलभ, जलद व शांततेत दर्शन मिळावे म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी मंदिर प्रशासनाला सूचना केल्या आहेत. त्यानुसार व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे काही इसमांकडून दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करून गोंधळ निर्माण होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे कायदा-सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करणाऱ्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

# मोदी सरकारमुळे देशात परिवर्तन -मुख्यमंत्री

### राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत विविध क्षेत्रांत झालेले अभूतपूर्व परिवर्तन आणि देशाची झालेली प्रगती इतकी अथांग आहे की, हे सर्व कार्य केवळ एका पुस्तकात किंवा भाषणात मांडणे अशक्य आहे. मोदीजींनी भारताला स्वाभिमानी आणि आत्मनिर्भर भारत म्हणून जागतिक पातळीवर उभे केले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.२५) येथे केले.




पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारला २६ मे रोजी १२ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने राष्ट्रनिर्माणाची तपपूर्ती या विशेष संग्राह्य ग्रंथाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी ते बोलत होते.

तपपूर्तीच्या पूर्वसंध्येला दादर येथील रवींद्र नाट्यमंदिरात झालेल्या या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री मंगलप्रभात लोढा, भाजप मुंबई अध्यक्ष आमदार अमित साटम, प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, आमदार योगेश सागर, संजय कुटे, सुनील राणे, राजेश पांडे यांच्यासह वरिष्ठ नेते, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, मोदी सरकारने गेल्या १२ वर्षांत सर्वात महत्त्वाची वाटचाल सामाजिक क्षेत्रात केली आहे. गरिबांना घरगुती गॅस, हक्काची घरे व शौचालये उपलब्ध करून देत मोदीजींनी गरीबकेंद्रित अजेंडा राबवला. याच धोरणामुळे अवघ्या १० वर्षांत भारताने तब्बल २५ कोटी लोकांना गरिबी रेषेच्या बाहेर काढले. जगातील कोणत्याही देशाला जे जमले नाही, ते भारताने करून दाखवले आणि हे जगानेही मान्य केले आहे. इतर मान्यवरांनीही विचार मांडले.

### आंबेनळी घाटातून गाडी दरीत कोसळली

# साताऱ्यातील आठ तरुणांचा भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

साताऱ्यामधील पर्यटकांची स्कॉर्पिओ गाडी पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटातून सुमारे एक हजार फूट खोल दरीत कोसळून आठ तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. कोकणातून मजामस्ती करून परतताना रविवारी पहाटे त्यांच्यावर काळाने झडप घातली, तर या भीषण अपघातातील मृतदेह सोमवारी (दि. २५) सकाळी दरीतून बाहेर काढण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार साताऱ्यातील आठ तरुण शुक्रवारी कोकणात फिरायला गेले होते. दापोलीतील हर्णे समुद्रकिनाऱ्यावरून मौजमजा करून शनिवारी रात्री ते परतीच्या प्रवासाला निघाले, मात्र रविवारी पहाटेपासून गाडीतील एकाही तरुणासोबत मोबाइलद्वारे संवाद होत नसल्याने नातेवाइकांनी सातारा पोलिसांकडे संपर्क साधला. यावेळी त्यांचे शेवटचे लोकेशन आंबेनळी घाटातील



मृत्यूचे थैमान घालणाऱ्या दाभिळटोक येथे आढळून आल्यानंतर अपघात झाला असल्याचा सुगावा लागला, मात्र काळोख्या रात्री शोध घेणे अशक्य असल्याने सोमवारी सकाळपासून पोलिसांनी रेस्क्यू टीमच्या मदतीने शोधमोहीम सुरू केली. दरी खूपच खोल असल्याने ड्रोन कॅमेऱ्याच्या सहाय्याने काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीचा शोध लावला गेला.

या स्कॉर्पिओ वाहनाचा ड्रायव्हर संदीप काटकर (३५) आझादपूर येथील रहिवासी होता. याव्यतिरिक्त महेश अनिल पवार (२५), आदित्य अशोक साळुंखे (२१), रितेश राजेंद्र लोखंडे (२५), सुहास जितेंद्र लोखंडे (२०), अंश समीर चव्हाण (१८) हे पाच तरुण आसगावचे, तर उत्कर्ष आनंदा शिंगटे (२१) आणि निखिल अभिमन्यू शिंगटे (२५) हे दोघे मरडे गावातील रहिवासी होते. सर्व आठ जणांचे मृतदेह दरीतून बाहेर काढून पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन व उत्तरीय तपासणीसाठी रवाना करण्यात आले.

दरम्यान, आंबेनळी घाटातील 'दाभिळटोक' अनेकदा मृत्यूचे 'टकमक टोक' ठरले असल्याचे आजपर्यंतच्या अपघातांमुळे अधोरेखित झाले आहे. पहिल्यांदा तेथे कार कोसळून एक कुटुंब ठार झाले होते. यानंतर याच ठिकाणी डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठाची बस कोसळून एकजण वगळता संपूर्ण बसमधील ३० प्रवासी ठार झाले होते. आता साताऱ्यातील आठ तरुण याच स्पॉटवरून मृत्युमुखी पडले आहेत. त्यांच्या अकाली मृत्यूमुळे साताऱ्यामध्ये शोक व्यक्त होत आहे.

## पनवेलमध्ये आज 'एक कृतार्थ संध्याकाळ'

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त साहित्यिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा आणि नवीन पनवेल शाखेच्या वतीने परिषदेचे सल्लागार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त एक कृतार्थ संध्याकाळ या विशेष साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मंगळवारी (दि.२६) सायंकाळी ५.३० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.

या कार्यक्रमात 'लोकनेता' या प्रतिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन, निमंत्रितांचे कविसंमेलन तसेच अभीष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे मराठी भाषा व उद्योगमंत्री



उदय सामंत, कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, लोकनेते रामशेठ ठाकूर, ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष 'पानिपत'कार विश्वास पाटील, ज्येष्ठ कवी व चित्रपट निर्माते दिग्दर्शक रामदास फुटाणे, सुप्रसिद्धध ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्ष नमिता कीर, कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.प्रदीप ढवळ, ज्येष्ठ साहित्यिक अरुण म्हात्रे, युवा नेते नगरसेवक परेश ठाकूर, सुप्रसिद्ध गझलकार ए.के.शेख, कोमसापचे विश्वस्त प्रा.एल.बी.पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कोमसापचे गणेश कोळी आणि संजय गुंजाळ यांनी केले आहे.

(विशेष कविता पान ३ वर..)

## गोतस्करांविरोधात राज्यात विशेष मोहीम

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने गोतस्करी आणि जनावरांच्या अवैध वाहतुकीविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. गायींची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्यांवर बुलडोझर कारवाईसह कडक उपाययोजना करण्यात येणार असल्याचे पत्रक परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी जारी केले आहे.

राज्य परिवहन विभागाने राज्यभर विशेष तपास मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. २५ ते २८ मेदरम्यान विभागीय परिवहन अधिकारी, उपविभागीय परिवहन अधिकारी, सीमा तपासणी नाके आणि वाहतूक यंत्रणेला युद्धपातळीवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दोषींना कोणतीही सवलत दिली जाणार नसून थेट वाहने जप्त केली जातील, असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे.

### धुळ्यात तिहेरी अपघातामध्ये सहा जणांचा मृत्यू, २६ जखमी

**धुळे** : येथील लळिंग घाटात सोमवारी (दि.२५) पहाटे वाळू वाहतूक करणारे दोन ट्रक आणि खासगी ट्रॅव्हल बस यांची धडक झाली. या अपघातात सहा जणांचा जागीच मृत्यू झाला असून २६ जण जखमी आहेत. जखमींवर धुळे येथील भाऊसाहेब हिरे वैद्यकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### जुन्नरमध्ये एसटीची दुचाकीला धडक; चौघे ठार

**जुन्नर** : कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर जुन्नरमधील डिंगोरे गावच्या हद्दीत रविवारी (दि. २४) रात्री कल्याणहून ओतूरच्या दिशेने येणाऱ्या विठ्ठलवाडी-पाथर्डी एसटी बसने समोरून येणाऱ्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर दुचाकीचाही चुराडा झाला.

## निवडक

### काश्मीरमधील रोप वे पडला बंद; ३०० पर्यटक हवेत लटकले!

**गुलमर्ग :** काश्मीरमधील गुलमर्ग गोंडोला या नावाने प्रसिद्ध असलेली गुलमर्गची केबल कारसेवा तांत्रिक बिघाडामुळे बंद पडली आणि सुमारे ३०० पर्यटक संकटात सापडले. यामध्ये महिला आणि लहान मुलांचाही समावेश होता. लष्कर, पोलीस तसेच नागरी प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू केले आणि केबल कारमध्ये अडकलेल्यांची सुटका केली.

### माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारींना पद्म पुरस्कार प्रदान



**नवी दिल्ली** : महाराष्ट्राचे माजी राज्यपाल आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भगतसिंह कोश्यारी यांना सोमवारी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात आयोजित एका समारंभात पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## धर्मासाठी एकत्र या -ना. नितेश राणे

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

हिंदू समाज जागृत होण्यासाठी १०० वर्षे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काम करीत आहे. त्यामुळे समाज पुढे जात आहे. मी मंत्री वगैरे टेम्परररी आहे, पण हिंदू म्हणून जन्माला आलोय. राष्ट्रापेक्षा कुणीही मोठा नाही. म्हणूनच भारत, तिरंगा आणि वंदे मातरम् यांचा अभिमान बाळगणाऱ्यांनी एकत्र येण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी केले.

कर्जत तालुक्यातील नेरळ येथील अंबिका नाका या ठिकाणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त विराट हिंदू संमेलनाचे आयोजन रविवारी (दि.२४) करण्यात आले होते. मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून या संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर विराट हिंदू संमेलन नेरळचे अध्यक्ष निवृत्त जवान कुमार जाधव, अविनाश मोरे, वर्षा जोशी, हभप दीपक महाराज जगताप, विश्वंभर




पार्टे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोकण सहकार्यवाह अ‍ॅड. अमोल सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

हिंदू समाजाची संख्या कमी करण्यासाठी विविध प्रकारचे जिहाद सुरू आहेत. हिंदूंनी आता एकत्र येऊन त्याला उत्तर देण्याची वेळ आली आहे. छत्रपती संभाजीराजांनी आपला धर्म बदलला नाही. त्यांचे मावळे म्हणून आपण जगले पाहिजे, असे सांगून ना. राणे पुढे म्हणाले की, अशोक खरात प्रकरणात कोणत्याही हिंदूने त्याची पाठराखण केली नाही. अशोक खरात आणि सज्जाद नोमिनी दोघे सारखेच आहेत. (पान २ वर..)

## अभिनंदन!



**पनवेल : दानशूर व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्यपदी फेरनिवड झाली आहे. याबद्दल संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगरे, संतोष गुजर, जे.जे. चिखलेकर, वैभव गावंड, विनय म्हात्रे, सोमनाथ पाठे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.** (अधिक छायाचित्रे पान ३ वर..)



# राज्यात इंधनाचा मुबलक साठा; नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये!



## मंत्री छगन भुजबळ यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची इंधन टंचाई नसल्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी (दि. २५) स्पष्ट केले, मात्र काही भागांत अफवांमुळे नागरिकांकडून अतिरिक्त इंधन खरेदी होत असल्याने पेट्रोल-डिझेल विक्रीत लक्षणीय वाढ झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून अनावश्यक साठा करू नये, असे आवाहनही मंत्री भुजबळ यांनी केले. मंत्रालयात आयोजित राज्यातील पेट्रोल-डिझेल वितरणाबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, राज्य शिधावाटप नियंत्रक चंद्रकांत डांगे तसेच विविध तेल कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी मंत्री भुजबळ यांनी सांगितले की, तेल कंपन्यांनी जिल्हा व तालुका स्तरावर नागरिकांमध्ये जनजागृती करावी. राज्यात पुरेसा इंधनसाठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू आहे. त्याबाबतची माहिती नागरिकांपर्यंत सातत्याने पोहचवावी. काही ठिकाणी किरकोळ घटनांच्या आधारे इंधन टंचाईच्या अफवा पसरवल्या जात आहेत. त्यामुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. ते रोखण्यासाठी स्थानिक प्रशासनाने आणि तेल कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या खरेदीवर लक्ष ठेवून अतिरिक्त साठेबाजी रोखावी.

राज्यातील जिल्हानिहाय विक्रीच्या आकडेवारीनुसार दैनंदिन विक्रीत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यात पेट्रोल विक्रीत सुमारे २३ टक्के; तर डिझेल विक्रीत तब्बल ५२ टक्के वाढ झाली आहे. अकोला येथे पेट्रोल विक्रीत ४४ टक्के, बुलढाणा येथे ४७ टक्के, जालना येथे ४९ टक्के; तर वर्धा येथे ४३ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. दरम्यान, बैठकीत एलपीजी आणि पीएनजी गॅसच्या उपलब्धता व वितरण व्यवस्थेचाही आढावा घेण्यात आला. नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

# ‘देशातील पहिला पाण्याचा सातबारा महाराष्ट्रात’

**मुंबई : प्रतिनिधी**

पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जल व्यवस्थापन करण्यासाठी आता जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर 'पाण्याचा सातबारा' देशात प्रथम महाराष्ट्रात विकसित करण्याचे नियोजन सुरू आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत सोमवारी (दि. २५) मंत्रालयातील बैठकीत याबाबतचा आढावा घेतला.



जलव्यवस्थापन करणाऱ्या “अक्वेरियम” संस्थेने यासाठी 'वॉटर ऑडिट' आणि 'बॅलन्सशीट'ची संकल्पना मांडली असून ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून ही बैठक आयोजित करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. सध्या सर्वत्र जमिनीच्या नोंदीसाठी 'सातबारा' उतारा अस्तित्वात आहे, मात्र पाण्यासाठी अशी कोणतीही नोंद प्रणाली नाही. पाण्याला जागतिक स्तरावर जो मान आणि दर्जा मिळायला हवा, तो सध्या मिळत नाही. एकदा पाण्याचे ऑडीट झाले की, त्याचा वापर कसा करायचा याबाबत काळजी घेतली जाते. जोपर्यंत पाण्याचा वापर रेकॉर्ड केला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण राहणार नाही आणि लोकांची पाण्याचा वापर करण्याबाबतची जबाबदारीही निश्चित होणार नाही. याच उद्देशाने 'ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंट'च्या धर्तीवर हे पाऊल उचलण्यात येत आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी अक्वेरियमचे प्रमुख डॉ. सुब्रमन्यम कंसूर, जलाभ्यासक डॉ. अविनाश कदम आणि उदय नायर यांनी एकत्रितपणे 'वॉटर अकाऊंटिंग फ्रेमवर्क' आणि 'वॉटर बॅलन्सशीट'ची अद्ययावत संकल्पना विकसित केली आहे. या अंतर्गत पाण्याचे तीन टप्प्यांत ऑडिट केले जाणार असून, त्याचे दरवर्षी वर्गीकरण केले जाईल. या प्रणालीमुळे ग्रामपंचायत किंवा पाणलोट क्षेत्रातील पाण्याचा साठा, आवक, जावक आणि शिल्लक पाणी याचा पारदर्शक ताळेबंद ठेवता येईल.

या योजनेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे केवळ पाण्याचे मोजमाप होणार नाही, तर पाण्याचे संवर्धन करणाऱ्यांना 'अक्वाक्रेडिट्स' च्या माध्यमातून प्रोत्साहन दिले जाईल. यामुळे ग्रामीण भागात पाण्याचा वापर अधिक जबाबदारीने आणि पारदर्शकपणे होईल व भविष्यात एक मोठी 'वॉटर इकॉनॉमी' उभी राहण्यास मदत मिळेल. महाराष्ट्र राज्य हा प्रयोग राबविणारे देशातील पहिले राज्य ठरणार आहे, असेही चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# अकरावीच्या आठ लाखांपेक्षा जास्त जागा राहणार रिक्त

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यामध्ये यंदा अकरावी प्रवेशासाठीच्या जागांमध्ये २८ हजार ९२९ जागांनी वाढ झाली आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशासाठी २१ लाख ९८ हजार ५८६ जागा उपलब्ध आहेत. मात्र प्रवेश प्रक्रियेसाठी फक्त १२ लाख विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. त्यामुळे यंदा गतवर्षीच्या तुलनेत आठ लाखांपेक्षा जास्त जागा रिक्त राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज्यभरामध्ये गतवर्षी प्रथमच अकरावी प्रवेश परीक्षा ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात आली होती. गतवर्षी अकरावी प्रवेशासाठी असलेल्या २१ लाख ६९ हजार ६५७ जागांपैकी तब्बल ६ लाख ५८ हजार ८४९ जागा रिक्त राहिल्या होत्या. त्यामुळे यंदा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करावेत यासाठी शिक्षण संचालनालयाने दहावीची अर्ज भरण्यासाठी शेवटचा दिवस परीक्षा संपताच अकरावी प्रवेश प्रक्रियेचा भाग १ भरण्याची प्रक्रिया सुरू केली होती. दरम्यान, अकरावी प्रवेशाची नियमित फेरी २१ मेपासून ३ जूनपर्यंत राबविण्यात येणार आहे.

# अहिल्यानगर पोलीस मुख्यालयात ‘स्मोक ग्रेनेड’चा स्फोट; चार पोलीस कर्मचारी जखमी

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

पोलिसांच्या सराव प्रात्यक्षिकादरम्यान चुकीच्या पद्धतीने ‘स्मोक ग्रेनेड’ हाताळला गेल्याने त्याचा पोलीस कर्मचाऱ्यांच्या हातातच स्फोट होऊन चौघे पोलीस कर्मचारी जखमी झाले. ही घटना सोमवारी (दि. २५) सकाळी पोलीस मुख्यालयातील कवायत मैदानावर घडली. या चौघाही कर्मचाऱ्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती पोलीस मुख्यालयाचे निरीक्षक उमेश परदेशी यांनी दिली.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून मुख्यालयासह जिल्ह्यात विविध ठिकाणी जमाव नियंत्रण प्रात्यक्षिकांचे सराव सुरू आहेत. पोलीस मुख्यालयात सकाळी सराव सुरू असतानाच ही घटना घडल्याचे पोलीस निरीक्षक परदेशी यांनी सांगितले. या घटनेने पोलीस वर्तुळामध्ये खळबळ उडाली आहे.



शुभम पांडुरंग कावरे, शिवराज संजय पवार, योगेश सोळुंके व गणेश मधे अशी जखमी पोलीस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. यातील कावरे, पवार व सोळुंके हे तिघे ‘आरसीपी’ तुकडीतील तर गणेश मध्ये ‘क्यूआरटी’ पथकातील जवान आहेत.

पोलीस मुख्यालयातील सरावादरम्यान जमाव नियंत्रण पथकातील १ आरसीपी व एक क्यूआरपी पथकातील ५३ जवानांसह व एक सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक उपस्थित होते. मुख्यालयाचे पोलीस निरीक्षक परदेशी यांच्या नियंत्रणाखाली हा सराव सुरू होता. सकाळी साडेनऊच्या सुमारास शुभम कावरे यांच्या हातातील स्मोक ग्रेनेड फेकण्याच्या वेळी त्याची सेफ्टी पिन काढली जात असतानाच लिव्हर पट्टी घसरून ही दुर्घटना घडली.

# ‘करवीर हायकर्स’ची एव्हरेस्ट बेस कॅम्प मोहीम फत्ते; प्रतिकूल हवामानावर मात

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

अत्यंत प्रतिकूल हवामान, उणे तापमान आणि खडतर मार्गाचा सामना करत कोल्हापूरच्या करवीर हायकर्सच्या सात सदस्यांनी समुद्रसपाटीपासून ५,३६४ मीटर उंचीवरील ‘एव्हरेस्ट बेस कॅम्प’ मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली.

या पथकात रत्नागिरीचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते आणि त्यांच्या पत्नी डॉ. सुप्रिया सातपुते यांचा समावेश होता. वयाच्या २१व्या वर्षी एव्हरेस्ट सर करणाऱ्या आणि ‘अन्नपूर्णा’ पर्वत मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गिर्यारोहक कस्तुरी सावेकर यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली.

मोहिमेची सुरुवात १५ मे रोजी नेपाळची राजधानी काठमांडू येथून झाली. पथकात चिपळूण येथील बी. के. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजच्या सहप्राध्यापक डॉ. सुप्रिया सातपुते, मुरूम (धाराशिव) येथील उद्योजक आप्पासाहेब मुंडासे, कोल्हापूरचे उद्योजक विशाल मेहता तसेच समाजमाध्यम प्रभावक नुपूर आणि अक्षय मठकर यांचाही समावेश होता. काठमांडूहून जगातील धोकादायक विमानतळांपैकी एक मानल्या जाणाऱ्या लुकला विमानतळ येथे छोट्या विमानाने पोहोचल्यानंतर प्रत्यक्ष ट्रेकला सुरुवात झाली. लुकलाफाकडींगनामचे बाजारतेंगबोचेदिंगबोचेलोबुचेगोरक्षेप असा प्रवास करत पथकाने ‘एव्हरेस्ट बेस कॅम्प’ गाठला.

शनिवारी (दि.२३) राष्ट्रीय ध्वज फडकावत आणि संविधानाची उद्देशिका प्रदर्शित करत मोहिमेची सांगता करण्यात आली. रात्री उणे १५ अंश सेल्सिअसपर्यंत घसरणारे तापमान, दिवसा ४ ते ६ अंशांदरम्यानची थंडी, लोबुचे ते ‘इबीसी’ दरम्यानचा जीवघेणा प्रवास, हाडे गोठवणारे वारे आणि दुर्गम मार्ग यामुळे या मोहिमेत सहभागींच्या मानसिक व शारीरिक क्षमतेची कठोर परीक्षा झाली. मात्र, शरीर आणि मनाच्या बळावर ही सर्व आव्हाने समर्थपणे पेलता येतात, असा अनुभव पथकाने व्यक्त केला. नेपाळमधील पीक १५ अॅडव्हेंचरचे शेखर तमांग, योगेंद्र तमांग आणि प्रशांत तमांग यांनी मोहिमेत मार्गदर्शक म्हणून काम पाहिले.

# मुरूड-बोरिवली रातराणी गाडीचे चाक निखळले; सुदैवाने प्रवासी बचावले

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड आगारातून नव्यानेच मुरूड-बोरिवली ही रातराणी गाडी रात्री १०.३० च्या दरम्यान सुरू करण्यात आली आहे. प्रवासी वर्गाची मागणी असते की गाडी रात्रीची आणि लांब पल्ल्याची असल्याने गाडी सुस्थितीत असणे खूप गरजेचे होते, परंतु नेहमीप्रमाणे दुर्लक्ष केल्याने नुकताच नको तो प्रकार घडून प्रवासी लोकांना नाहक दुखापत झाली असती.

रविवारी रात्री सुटणारी मुरूड-बोरिवली ही गाडी मुरूड आगारातून १०.३० वाजता सुटली. सदरची गाडी नागाव परिसरात आली असता या गाडीचे पाठीमागच्या बाजूकडील चाक निखळले व गाडीसोबत चालू लागले. पाठीमागून येणाऱ्या स्कुटीचालकाच्या ही बाब लक्षात येताच तत्काळ गाडी गाडीच्या पुढे जाऊन त्याने ही बाब चालकाच्या लक्षात आणून दिली. गाडी त्वरित थांबण्यात येऊन गाडीचे निखळलेले चाक लावण्यात आले.

निखळलेले चाक गाडीच्या पुढेच निघून गेल्याने प्रवासीवर्गाने एकत्र येऊन हे चाक गाडीजवळ आणले. त्यानंतर चालक व वाहकाने सर्व नट व इतर साहित्य शोधून चाक पूर्ववत लावण्यासाठी मेहनत घेतली. हे सर्व सोपस्कार करताना किमान दोन तास वाया गेल्याने प्रवासी खूप त्रस्त झाले. मुरुड आगार व्यवस्थापकांनी गाड्यांची दुरुस्ती व देखभाल चांगली ठेवली तरच प्रवासी वर्ग निश्चिंत राहणार आहे.




# राजनालाच्या पाण्यावर शेतकऱ्यांचा मळा फुलला

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका भात शेतीसाठी ओळखला जातो. येथे पावसाच्या पाण्यावर तसेच राजनालाच्या पाण्यावर दुबार भातशेती केली जाते, मात्र मागील काही वर्षात अवकाळी पाऊस, शेतमजुरांची कमतरता तसेच अन्य कारणांमुळे भातशेती काही प्रमाणात दुर्लक्षित झाली होती, मात्र कर्जत कृषी विभागाने पुन्हा एकदा शेतकऱ्यांना भातशेतीचे महत्त्व अधोरेखित करत चांगले बियाणे, खते आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिल्यामुळे यंदा राजनाला सिंचनाखालील भातशेतीचे क्षेत्र काही प्रमाणात वाढले असल्याचे कर्जत तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी भातशेतीबरोबरच वांगी, मिरची, कारली, घोसाळी, भेंडी, कलिंगड, टोमॅटो, दोडका, काकडी आदी



फळभाज्यांचेही उत्पादन घेतले आहे. भातशेतीबरोबरच आत्मा योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२६ या योजनेनुसार कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना नाचणी पीक प्रात्यक्षिक घटकासाठी नाचणी बियाणेही उपलब्ध करून सुमारे १०० किलो नाचणी बियाणे शेतकऱ्यांच्या गटांना पुरविण्यात येणार आहेत. नाचणी ही पौष्टिक असल्याने नाचणीला चांगली मागणी असून भावही चांगला मिळत आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांकडे नाचणी पिकासाठी आवश्यक असलेली शेतजमीन उपलब्ध आहे अशांनी नाचणीचे पीक घ्यावे, असे आवाहनही कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे.

आधुनिक पद्धतीने शेती तसेच चांगले बियाणे आणि योग्य मार्गदर्शन केल्यामुळे यंदा भातशेतीच्या उत्पादनाचे क्षेत्र वाढले आहे. तसेच शेतकऱ्यांनी भातशेतीवर अधिकाधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.-राजाराम शिंदे, तालुका कृषी अधिकारी, कर्जत भातशेतीबरोबरच भाजीपाल्याचेही उत्पादन घेतल्यास आर्थिक हातभार. लागण्यास अधिक मदत होते तसेच ज्या शेतकऱ्यांना शक्य आहे त्यांनी शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय केल्यास नक्कीच शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावू शकतो, असे गौरकामत येथील शेतकरी अनिल देशमुख यांनी म्हटले आहे.

पान १ वरुन

## धर्मासाठी एकत्र या -ना. नितेश राणे

अविनाश मोरे यांनी जमेल तसे हिंदू धर्मासाठी काम करू या, अशी साद घातली. वर्षा जोशी यांनी निरोगी समाज हीच समाजाची खरी ओळख असल्याचे सांगितले. अॅड. सूर्यवंशी यांनी प्रास्ताविकात मंत्री नितेश राणे यांच्यामुळे नेरळकरांना ऊर्जा मिळाल्याचे सांगितले.

उपस्थितांचे स्वागत मंगेश म्हसकर, नरेश मसणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार कुमार जाधव यांनी मानले. या संमेलनाला दीपक गायकवाड, साईनाथ श्रीखंडे, दीपक पाटील आदींसह नेरळ परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरडखोल मत्स्यबंदरामुळे श्रीवर्धनच्या मच्छीमारांचा उत्कर्ष

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल येथे उभारण्यात येणारा १६७.२२ कोटी रुपयांचा आधुनिक मत्स्यबंदर प्रकल्प हा संपूर्ण किनारपट्टीच्या आर्थिक विकासाला चालना देणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरणार आहे. या प्रकल्पामुळे तालुक्यातील हजारो मच्छीमार कुटुंबांच्या जीवनमानात मोठा बदल होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाच्या माध्यमातून विकसित होणारा हा प्रकल्प केवळ बंदरापुरता मर्यादित नसून मत्स्यव्यवसाय, पर्यटन, वाहतूक, कोल्ड स्टोरेज, बर्फ उद्योग आणि स्थानिक रोजगार यांना नवे बळ देणारा ठरणार आहे.



श्रीवर्धन तालुक्यातील जीवनाबंदर, मुळगाव कोळीवाडा, दिवेआगर, भरडखोल, कुडगाव, आदगाव, बागमांडला आणि दिघी परिसरातील मच्छीमार मोठ्या प्रमाणावर मासेमारी व्यवसायावर अवलंबून आहेत. मात्र आजपर्यंत योग्य बंदर सुविधा, सुरक्षित नांगर व्यवस्था आणि स्थानिक स्तरावर लिलाव केंद्र उपलब्ध नसल्याने मच्छीमारांना मुंबईतील क्रॉफर्ड मार्केट, नवी मुंबई, पुणे यांसारख्या घाऊक बाजारपेठांवर अवलंबून राहावे लागत होते. यामुळे वाहतूक खर्च, वेळ आणि आर्थिक जोखीम मोठ्या प्रमाणात वाढत होती. भरडखोल येथे आधुनिक जेट्टी, मासळी लिलाव केंद्र, कोल्ड स्टोरेज, बर्फ निर्मिती सुविधा आणि सुरक्षित बोट पार्किंग उभारले जाणार असल्याने मच्छीमारांना आता स्थानिक पातळीवरच व्यापाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. मासळी अधिक काळ ताजी ठेवता येणार असल्याने बाजारभाव चांगला मिळेल आणि थेट नफ्यात वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या प्रकल्पांतर्गत सुमारे ५०० ते ६०० मच्छीमार बोटींसाठी सुरक्षित व सुसज्ज पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. तसेच ६५० मीटर लांबीचा ब्रेकवॉटर, क्वे वॉल आणि संरक्षण भिंत उभारण्यात येणार असल्याने वादळ, भरती आणि खराब हवामानात बोटींचे होणारे नुकसान मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. बंदर परिसरातील गाळ उपसल्यामुळे समुद्रातून किनाऱ्यावर ये-जा करणे अधिक सुरक्षित आणि सुलभ होईल.रायगड जिल्ह्यातील करंजा, धरमतर, मांडवा, रेवस, मोरा, रेवदंडा यांसारख्या सुरक्षित बंदरांच्या यादीत भरडखोल बंदराचाही समावेश होणार असल्याने श्रीवर्धन तालुक्याच्या सागरी अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळणार आहे.

विशेष म्हणजे भरडखोल हे भौगोलिकदृष्ट्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने तालुक्यातील सर्व किनारी गावांतील मच्छीमारांना या प्रकल्पाचा थेट फायदा होणार आहे. अत्याधुनिक बंदर उभारणीमुळे किनारपट्टीवरील पर्यटन व्यवसायालाही चालना मिळण्याची शक्यता आहे. बंदर परिसरात भविष्यात पर्यटन सुविधा, मत्स्य प्रक्रिया उद्योग आणि संबंधित सेवा व्यवसाय वाढल्यास स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

# दुखवटा

## रजनी सुतार



**माणगाव** : येथील नगरपंचायत हद्दीतील खांदाड गावचे रहिवासी तथा नगरपंचायतीचे कर्मचारी निलेश सुतार व राजेश सुतार यांच्या मातोश्री रजनी नथुराम सुतार यांचे गुरुवारी (दि.२१) अल्पशा आजाराने वयाच्या ७३व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने खांदाड ग्रामस्थ व नातेवाइकांवर शोककळा पसरली आहे.

## नित्यानंद कामत



**अलिबाग** : येथील हॉटेल व्यावसायिक व क्रीडा कार्यकर्ते नित्यानंद कामत यांचे रविवारी (दि. २४) पुण्यात निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. सोमवारी त्यांच्यावर अलिबाग येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. नित्यानंद कामत यांचे अलिबागच्या हॉटेल उद्योगाच्या उभारणीत मोठे योगदान होते. नित्यानंद कामत मनमिळावू, दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व होते.

# उरणमध्ये एसआयआर कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा





**उरण : रामप्रहर वृत्त**

भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेल्या मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी श्रीमती भागबाई चांगु ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी नोड येथे सोमवारी उरण येथे बैठक पार पडली. यावेळी मतदारयाद्यांचे अद्ययावतीकरण आणि पारदर्शकता सुनिश्चित करण्याबाबत सविस्तर रणनीती आखण्यात आली.

या बैठकीला आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड अध्यक्ष अविनाश कोळी, उरण विधासभा बीएलए अविनाश गाताडे, उपाध्यक्ष रवि भोईर, उरण ग्रामीण मंडळ धनेश गावंड, शहर मंडळ प्रसाद भोईर, कौशिक शाह, माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेविका सायली म्हात्रे उपस्थित होते. उरण विधानसभा मतदारसंघातील मतदारयाद्या दोषमुक्त करणे आणि अवैध नोंदी रोखणे यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

## करंजाडेत महावितरणविरोधात एल्गार; व्यापक स्वाक्षरी मोहीम

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या ६ वर्षांपासून अखंडित वीजपुरवठा आणि भीषण 'लो व्होल्टेज'च्या समस्येचा सामना करणाऱ्या करंजाडे सेक्टर ५ आणि ५ ए मधील रहिवाशांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. महावितरणच्या या उदासीन कारभाराविरोधात आता नागरिकांनी थेट संघर्षाचे पाऊल उचलले असून, करंजाडेचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांच्या खंबीर नेतृत्वाखाली संपूर्ण सेक्टरमध्ये व्यापक 'स्वाक्षरी मोहीम' सुरू करण्यात आली आहे.




करंजाडे सेक्टर ५ आणि ५ ए हा वेगाने विकसित होणारा उच्चभ्रू नोड म्हणून ओळखला जातो. महावितरण या भागातून नियमितपणे कोट्यवधी रुपयांचा महसूल गोळा करते. मात्र, येथील मुख्य सप्लाय वाहिनी (Main Supply Cable) गेल्या ६ वर्षांपासून जर्जर अवस्थेत आहे. तिच्यात वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडामुळे दिवसातून ४ ते ५ वेळा वीज खंडित होणे ही रोजची बाब झाली आहे. तसेच, गेल्या काही काळापासून येथे 'लो व्होल्टेज'ची मोठी समस्या निर्माण झाली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत कमी दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे रहिवाशांचे फ्रीज, ए.सी., पाण्याचे पंप आणि इतर महागडी इलेक्ट्रॉनिक उपकरणे जळून खाक होत आहेत. स्थानिक नागरिकांनी महावितरणच्या पनवेल कार्यालयाकडे वारंवार दाद मागितली, परंतु "निधीची कमतरता आहे" असे पळवाटा काढणारे उत्तर देऊन ६ वर्षांपासून नागरिकांची फसवणूक केली जात आहे.

या जनआंदोलनाचे नेतृत्व हाती घेताना माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी महावितरण प्रशासनाला तीव्र इशारा दिला आहे. "करंजाडेतील नागरिक वेळेवर वीज बिल भरतात, मग त्यांना ६ वर्षे नरकयातना का भोगाव्या लागत आहेत? निधी नाही हे महावितरणचे कारण आम्ही आता सहन करणार नाही. नागरिकांच्या हक्कासाठी ही स्वाक्षरी मोहीम सुरू करण्यात आली आहे. आम्ही हजारो रहिवाशांच्या स्वाक्षऱ्यांचे हे पत्र घेऊन उरण विधानसभेचे आमदार आणि महावितरणच्या मुख्य अभियंत्यांची भेट घेणार आहोत.

आमदार निधी किंवा जिल्हा नियोजन समितीच्या (DPDC) माध्यमातून यासाठी निधी खेचून आणू. मात्र, जर पुढील १५ दिवसांत महावितरणने मुख्य वाहिनी बदलण्याचे काम सुरू केले नाही, तर सेक्टर ५ आणि ५ए मधील हजारो रहिवाशांना सोबत घेऊन महावितरण कार्यालयावर तीव्र ठिय्या आंदोलन आणि धडक मोर्चा काढण्यात येईल," असा आक्रमक पवित्रा रामेश्वर आंग्रे यांनी घेतला आहे. या स्वाक्षरी मोहिमेची घोषणा होताच सेक्टर ५ आणि ५ ए मधील सर्व सोसायट्यांच्या अध्यक्ष, सचिव आणि रहिवाशांनी एकत्र येत या मोहिमेला पाठिंबा दिला आहे. केवळ दोन दिवसांत हजारो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या गोळा करून महावितरण आणि प्रशासनाचे डोळे उघडण्याचा निर्धार रहिवाशांनी केला आहे.

## अपघातात तरुणाचा मृत्यू; दुसरा जखमी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भरधाव वेगाने मोटरसायकल चालवल्याने ती रस्त्याच्या खाली जाऊन आदळली आणि एका तरुणाचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाणे २४ मे रोजी करण्यात आली. अक्षय किसन काटकर (राहणार मुंब्रा देवी कॉलनी दिवापूर्व ठाणे) असे मृत तरुणाचे नाव आहे.

२४ मे रोजी साडेसातच्या सुमारास अक्षय किसन काटकर हा त्याच्या ताब्यातील मोटरसायकल एम एच ०४ एम आय ७५ ३२ ही घेऊन भरधाव वेगाने जात होता. यावेळी जुना मुंबई पुणे हायवे रोडवर भोकरपाडा गावाजवळ त्याची मोटरसायकल रस्त्याच्या खाली गेली आणि जोरात आदळली. यावेळी त्याच्या पाठीमागे बसलेला सुशांत दौलत पवार (राहणार मुंब्रा देवी कॉलनी) हा जखमी झाला तर अक्षय काटकर याचा मृत्यू झाला.





**पनवेल : दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्यपदी फेरनिवड झाली आहे. याबद्दल संस्थेच्या समन्वय समिती सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, जनरल बॉडी सदस्य संजीवनी म्हात्रे, सुधीर ठाकूर, मोखाडा हायस्कूलचे उपशिक्षक बी.बी. सुतार, पी.आर. म्हात्रे, आगरी दर्पण मासिकाचे सहसंपादक डी.बी. पाटील आदींनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले. दरम्यान, संस्थेच्या समन्वय समितीपदी ज्योत्स्ना ठाकूर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह उपस्थिती मान्यवरांनी यावेळी अभिनंदन केले, तर आगरी दर्पण मासिकाचे प्रकाशन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.**



**पनवेल : सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे डी. बी. पाटील यांची `आगरी दर्पण` मासिकाच्या सहसंपादकपदी निवड झाली आहे. याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी लोकनेते लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी डी .बी.पाटील यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सोबत आगरी समाज मंडळातील कर्मचारी विद्याधर पाटील आणि यशोपुरम सोसायटीचे सचिव संतोष कदम उपस्थित होते.**

## पनवेलकरांना मोठा दिलासा; पाणी कपातीचा निर्णय तूर्तास रद्द

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलकर नागरिकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. आगामी काळातील पाण्याची परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनातर्फे आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे जे नियोजन प्रस्तावित करण्यात आले होते, ते सध्या पूर्णपणे रद्द करण्यात आले आहे.

या निर्णयामुळे त्यामुळे प्रशासनाने यापूर्वी जाहीर केलेले पाणी कपातीचे आणि बंदचे वेळापत्रक आता लागू राहणार नसून, शहरातील पाणीपुरवठा पूर्वीसारखाच नियमित आणि सुरळीत सुरू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, भविष्यात जर पुन्हा कधी अशा प्रकारच्या एकदिवसीय पाणी कपातीचे वेळापत्रक लागू करण्याची आवश्यकता भासली, तर त्याबाबत नागरिकांना आगाऊ सूचित केले जाईल, असेदेखील सांगण्यात आले आहे. ऐन उन्हाळ्यात पाणी कपातीचे संकट टळल्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असून, प्रशासनाने नागरिकांनी आतापर्यंत केलेल्या सहकार्याबद्दल सर्व पनवेलकरांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## उरणमध्ये दशपर्णी अर्क, गोकृपा अमृत आणि जीवामृत तयार करण्याची प्रात्यक्षिके

**उरण : प्रतिनिधी**

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे भातबियाणांसह इतर पिकांच्या उत्पादनावर शेतकऱ्यांकडून भर दिला जात आहे. उरण तालुक्यात कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगामाच्या बैठकीतून आढावा घेतला जात आहे. तसेच महाबीजासह इतर खाजगी कंपनीकडून बियाणे व खते उपलब्ध होणार आहेत.दरम्यान उरण तालुका कृषी विभागामार्फत कृषी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात गावोगावी दशपर्णी अर्क, गोकृपा अमृत, जीवामृत असे पिकांची रोगप्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी तसेच जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी चिरनेर येथील श्री महागणपती शेतकरी गटातर्फे दशपर्णी अर्क तयार करण्यात आला आहे.



कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा गायकवाड, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली काल सोमवारी २५ मे रोजी प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. यामध्ये कडुलिंबाची पाने, करजाची पाने, निरगुडीची पाने, घाणेरीची पाने, सिताफळीची पाने, रुईची पाने, पपईची पाने, मोमरी एरंडाची पाने, लाल कन्हेरीची पाने, गुळवेल, धोतरा शेण, गोमूत्र या सर्व मिश्रणातून दशपर्णी अर्क तयार करण्यात आला आहे.

## 'पनवेलमधील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे'

**पनवेल : वार्ताहर**

१९६४मध्ये बांधलेले पनवेल पालिकेच्या देहरंग धरणाच्या आणि साठ्याची समस्या गेल्या अनेक वर्षापासून वाढत्या लोकसंख्येमुळे वाढत आहे तसेच यावर्षीचा प्रचंड उष्णतेचा प्रभाव आणि बाष्पीभवन यामुळे पाणी कमी होण्याची तीव्रता अधिक जाणवली आहे. या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या यंत्रणेकडून महापालिका पाणी विकत घेऊन जनतेच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्याचा आटोकात प्रयत्न करीत आहे. पाणीटंचाईवर कायमचा तोडगा काढण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि महानगरपालिका संयुक्तपणे दीर्घकालीन योजनेवर काम करत आहे तोपर्यंत नागरिकांनी सहकार्य करणे अत्यंत आवश्यक आहे, असे आवाहन माजी नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे पनवेल शहर जिल्हाध्यक्ष शिवदास कांबळे यांनी केले आहे.

येथील आंतरराष्ट्रीय विमानतळ, महत्त्वपूर्ण रेल्वे स्टेशन आणि इतर लोकसंख्या वाढीसाठी पोषक असलेली परिस्थिती बघता पनवेलमध्ये भारतीय शहरीकरण लक्षात घेता आणि त्यांचाही यापेक्षाही तीव्र होण्याची शक्यता असल्यामुळे नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरून व पाणी वापराच्या संदर्भामध्ये सगळ्या नियमांचे पालन करून महानगरपालिकेला सहकार्य करावे. पनवेलची वैभवशाली परंपरेला गालबोट लागणार नाही तसेच मोठमोठे प्रकल्प आणि शहराचा होऊ घातलेला विस्तार अविरतपणे सुरू राहावा याकरता कटीबद्ध रहावे, अशी विनंतीही राष्ट्रवादीचे नेते व माजी नगरसेवक शिवदास कांबळे यांनी नागरिकांना केली आहे.

## पनवेल शहर वाहतूक शाखेच्या सतर्कतेमुळे चोरीची दुचाकी हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार महेंद्रसिंग राजपूत हे क्रेन व्हॅनद्वारे गस्त करीत असताना पनवेल रेल्वे स्टेशन पूर्व बाजूस नीलकमल हॉटेल समोर नो पार्किंगमध्ये उभी असलेली मोटारसायकल क्रमांक MH४८CL९१६१ ही टोविंग करून आणण्यात आली होती.

सदर वाहनाच्या मालकाशी मोबाईलद्वारे संपर्क साधला असता संबंधित मोटारसायकल नागपाडा पोलीस ठाणे हद्दीतून चोरीस गेल्याचे समोर आले. त्यानंतर वाहन मालकास याबाबत माहिती देऊन वाहन रीतसर ताब्यात घेऊन जाण्याबाबत समज देण्यात आली. पनवेल शहर वाहतूक शाखेच्या सतर्कतेमुळे चोरीस गेलेली मोटारसायकल शोधण्यात यश आले असून या कार्यवाहीचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. पुढील आवश्यक कार्यवाही सुरू आहे.



## लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव विशेष

***कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा आणि नवीन पनवेल शाखेच्या वतीने परिषदेचे सल्लागार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त एक कृतार्थ संध्याकाळ या विशेष साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी (दि.२६) पनवेलमध्ये करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ५.३० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. यानिमित्ताने काही कवींनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याविषयी कवितांमधून मांडलेल्या भावना...***

### सर्वांसाठी आनंदोत्सव

तडफदार नेतृत्व आपुले मनात चंद्राची शीतलता ।
शब्द शब्द हृदयात जपावा असे बोल हळवी कोमलता ।।

जाग्या होती आशा-आकांक्षा गरिबांच्या ।
रयतेचा त्राता लाभे रूपाने तुमच्या ।।

वक्तृत्वाची मधाळ वाणी, प्रेम, जिव्हाळा ।
जनतेच्याही मनामनातून तुमचाच लळा ॥

सभ्य, शांत, संयमी असे व्यक्तित्व आपले ।
मोहक वाणीने तुम्ही सर्वांस बांधले ।।

दानशूर म्हणूनी चोहिकडे किर्ती तुमची ।
मनांमनांवर प्रेमाचीही सत्ता तुमची ॥

प्रशांत आणिक परेश भूषण पनवेलीचे ।
प्रेरक तुम्ही तरुणांचे आणिक जनतेचे ।।

आशास्थानच या शहराचे भाग्यविधाता ।
आधाराचे 'रामशेठ' हे नावच त्राता ।।

संतपुरुष लाभला असे हा राजकारणा ।
आयुरारोग्य मिळो तुम्हाला हीच प्रार्थना ॥

साजरा होई तुमचा अमृत महोत्सव ।
सर्वांसाठी आहे हा तर आनंदोत्सव ।।

**-अे.के. शेख, ज्येष्ठ गझलकार**

### रामचा रामशेठ झाला गं...

विठोबा खंड्डाप्पा शाळेचा शिक्षक आमचा
विठोबा तेला पावला गं,
रामचा रामशेठ झाला गं..
शेतकऱ्याची लढाई, आरपारचा लढा
रांजणपाडा, सिडकोशी लढाई लढला गं..
रामचा रामशेठ झाला गं..
जमिनीला भाव, तडजोड नाय, पोलिसाची लाठी,
एकजुटीची काठी, हिंमत त्याची मोठी, लाखाचा
मोर्चा, एकच चर्चा, विजय त्याचा झाला गं..
रामचा रामशेठ झाला गं...
पनवेल ते दिल्ली, दणाणली गल्ली
'जायंट किलर' ठरला गं..
रामचा रामशेठ झाला गं..
देता-देता इतुके देतो..
मोखाड्याच्या पाड्यावर कॉलेज बांधतो
स्वप्नातबी विचार केला नव्हता गं..
रामचा रामशेठ झाला गं...
पन्नाशी झाली, पंच्चाहत्तरीही पार केली
शताब्दी साजरी करणार गं..
रामचा रामशेठ झाला गं..

**-मधुकर भावे, ज्येष्ठ पत्रकार**

### लोकहिताचे प्रेरणास्त्रोत

[लो] कहिताचे प्रेरणास्त्रोत आणि स्फूर्तीस्थान आहे
[क] र्तृत्व त्यांचे महान इतुके की
[ने] तृत्वाला द्यावा 'सलाम' असा मान-सन्मान आहे
[ता] रीफ काय करावी आणखी, त्यांच्या नावातच
'श्री राम' आहे
[रा] यगडातील ज्येष्ठ उद्योगपती, शिक्षणमहर्षी अन् त्यांचे
'लोकनेते'पद विख्यात आहे
[म] नात 'दाना'चे औदार्य अन् दातृत्वही अनमोल आहे
[शे] तकरी-कष्टकरी-प्रकल्पग्रस्तांचे नेते ते, हे तर
'मानवते'चे वरदान आहे
[ठ] सा असा जन-मानसात की तयांचे समाजकार्य
'अनिर्बंध' आहे
[ठा] वूक साऱ्यांनाच हे 'अमृत महोत्सवी' वर्षपूर्ती आहे
ते शतायु-दीर्घायु होवोत अशा लाख-कोटी शुभेच्छा!
[कु] णी म्हणोत 'काही-बाही', पण साहित्य-संस्कृती,
कला-परंपरांचा इथे उत्कट अभिमान आहे!
[र] वी-चंद्र जसे चमकती आकाशी तसेच चमकावे आपण
ही रयतेच्या मनी 'खास बात' आहे!

**-सुरेशचंद्र म्हात्रे, ज्येष्ठ कवी**

## संपादकीय

# भाकड भाकिताचे भविष्य

देशातील तमाम निवडणुकांमध्ये जनतेचा भक्कम कौल संपादन करून आणि जनादेशाच्या मजबूत पायावर उभे असलेले मोदी सरकार पडावे यासाठी काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी आपापले देव पाण्यात घालून ठेवले असतानाही त्यात अपेक्षित यश मिळत नसल्याने विरोधकांची अवस्था सैरभैर झाली आहे.

**राजकारणात भाकिते वर्तविणाऱ्या नेत्यांची कधीच वानवा नव्हती. महाराष्ट्रातील एका नेत्याने गेल्या दहा वर्षांत वर्तविलेली भाकिते संकलित केली, तर भाकितांच्या भावनेची पायमल्ली व्हावी आणि भाकितांवर भक्ती असलेल्या उरल्यासुरल्यांचाही भ्रमनिरास व्हावा असेच चित्र दिसेल. तरीही, भाकिते वर्तवून संभ्रम वाढविणे हे राजकारणातील तंत्र असते. लोकांची स्मरणशक्ती तोकडी असते अशीच राजकारणातील काहींची समजूत असल्याने लोकांना संभ्रमित करण्यासाठी भाकिते वर्तवत राहण्याचा धंदा अनेक कुडमुडे राजकारणी कायम करत असतात. आता अशा कुडमुड्यांचे पीक थेट केंद्रातील राजकारणापर्यंत पोहोचले असावे असे दिसते. मोदी सरकार वर्षभर टिकणार नाही असे भाकित वर्तवून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी कुडमुड्यांच्या यादीत प्रवेश केलेला दिसतो. वस्तुस्थिती पाहिली, तर राहुल गांधी यांचे हे भाकित म्हणजे केवळ राजकीय हूल आहे, हे स्पष्ट दिसते. आता अपेक्षापूर्तीसाठी इकडेतिकडे पाहात असतानाच विरोधकांना आभासी समाजमाध्यमांवर स्थापन झालेल्या एका आभासी राजकीय मंचाच्या उदयात आशेची स्वप्ने दिसू लागल्यामुळेच कदाचित राहुल गांधींना असे भाकड भाकित वर्तविण्याचा मोह अनावर झाला असावा. अशी भाकिते वर्तविणे हा राजकीय नेत्यांचा एक छंददेखील असतो, पण प्रत्येक भाकिताचे राजकीय परिणाम साधले नाहीत, तर त्याचा सामाजिक स्थैर्यवर परिणाम होणार नाही हे पाहणे प्रत्येक जबाबदार राजकीय नेत्याचे कर्तव्य असते. राहुल गांधी यांनी मोदी सरकारविषयी वर्तविलेले भाकित म्हणजे राजकीय स्वार्थी अपेक्षेचे प्रतिबिंब असले, तरी अशा अफवा माजवून लोकांमध्ये संभ्रम पसरविण्याचा आणि त्याद्वारे देशात अराजक किंवा अस्थिरता माजविण्याचा प्रयत्न होत असल्याचा भारतीय जनता पक्षाच्या आरोपांचा दखल घ्यावयास हवी. आभासी मंचावर स्थापन झालेल्या झुरळ पार्टीला मिळालेल्या आभासी पाठिंब्यामुळे, भाजपला आव्हान देणारी शक्ती उदयास आल्याच्या भावनेने या हतबल विरोधकांना अपेक्षापूतीची स्वप्ने पडू लागली आहेत, हे स्पष्ट झाले आहे. नीट परीक्षेतील गैरप्रकारावरून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या विरोधात 'झुरळ पार्टी'ने उघडलेल्या मोहिमेचे श्रेय पळविण्याकरिता आता वास्तवातील विरोधकांची चढाओढ सुरू झाली असून राहुल गांधींना या मोहिमेत उद्याच्या अपेक्षापूर्तीची आशा दिसू लागली आहे. मोदी सरकार कोसळेल असे राहुल गांधींचे भाकित म्हणजे देशात अराजक माजवून अस्थिरता निर्माण करण्याचा विरोधकांचा आणि त्यांच्या 'टुलकिट टोळक्या'चा व्यापक कट आहे, असा स्पष्ट आरोप भाजपने केला आहे. काँग्रेसच्या अल्पसंख्याक सल्लागार समितीच्या बैठकीत बोलताना राहुल गांधी यांनी मोदी सरकार वर्षभरात कोसळेल असे भाकित वर्तविले. यातून देशातील जनतेच्या मनात अस्थिरतेची भावना रुजविण्याचा त्यांचा उद्देश असला तरी मोदी सरकारला भक्कम जनादेश लाभला असून लोकशाही मार्गाने सत्तेवर आलेल्या मोदी सरकारची व देशाची प्रतिमा मलीन करण्याचा व लोकशाही व्यवस्था खिळखिळी करण्याचा हा प्रयत्न आहे, असा आरोपही भाजपने केला आहे. ज्या भाकितांना वास्तवाचा कोणताही भक्कम आधार नाही, जी भाकिते जनतेला मानवणार नाहीत अशा भोंदू आणि भाकड भाकितांनी भूकंप होईल ही समजूत भ्रामक ठरत असल्यामुळेच भाकितांचे गांभीर्य संपुष्टात आलेले आहे. राहुल गांधींच्या भाकिताचेही तेच भविष्य राहणार आहे.**

# चुलीपासून चांद्रयानापर्यंत : मोदी सरकारच्या एका तपाची झेप!





२५ मे २०२६... भारतीय लोकशाहीच्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा. याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारला केंद्रात सलग एक तप म्हणजेच १२ वर्षे पूर्ण होत आहेत. २६ मे २०१४ रोजी 'मी देश नाही विकू देणार, देश नाही झुकू देणार' या निर्धाराने शपथ घेऊन सुरू झालेला प्रवास आज 'विकसित भारत २०४७'च्या महाद्वारावर येऊन पोहचला आहे. गेल्या १२ वर्षांचा लेखाजोखा मांडायचा झाला तर एक वाक्य पुरेसे आहे : हे वर्षे केवळ सत्तांतराची नव्हती, तर व्यवस्थांतर, विचारांतर आणि युगांतराची होती.

**पायाभूत सुविधा : विकासाचा राजमार्ग**

२०१४ पूर्वी देशात पायाभूत सुविधांची अवस्था दयनीय होती. प्रकल्प दशकानुदशके कागदावरच राहायचे. मोदी सरकारने 'प्रगती' प्लॅटफॉर्मवरून स्वतः पंतप्रधानांनी दर महिन्याला १५ लाख कोटींहून अधिक किमतीच्या प्रकल्पांचा आढावा घेतला. परिणाम आज दिसत आहे. देशात दररोज ३७ किलोमीटरचे महामार्ग बांधले जात आहेत. २०१४मध्ये हे प्रमाण केवळ १२ किमी होते. दिल्ली-मुंबई एक्सप्रेस-वे, द्वारका एक्सप्रेस-वे, पूर्वांचल एक्सप्रेस-वे यांनी वेळ आणि इंधन दोन्ही वाचवले आहे.

'भारतमाला' योजनेतून ३४,८०० किमीचे रस्ते तर 'सागरमाला'मधून १४,५०० किमीचे किनारी महामार्ग विकसित होत आहेत. रेल्वेने कात टाकली आहे. १५० हून अधिक वंदे भारत एक्सप्रेस धावत आहेत. अमृत भारत स्टेशन योजनेतून १३०८ रेल्वे स्थानकांचा कायापालट होत आहे. पनवेल-कर्जत, उरण-जेएनपीटीसारखे नवीन मार्ग मुंबईकरांचा श्वास मोकळा करत आहेत. देशातील विमानतळांची संख्या ७४ वरून १६० च्या पुढे गेली आहे. 'उडान' योजनेमुळे टी-शर्ट, हवाई चप्पल घालणारा सामान्य माणूस आज विमानाने प्रवास करतो आहे. २०१४ मध्ये देशात केवळ ५ मेट्रो शहरे होती, आज २३ शहरांमध्ये मेट्रो धावते आहे.

**गरीब कल्याण : अंत्योदयाचा संकल्प**

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या 'अंत्योदय' संकल्पनेला मोदी सरकारने जमिनीवर उतरवले. 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना' हे जगातील सर्वात मोठे अन्न सुरक्षा कवच ठरले. कोरोना महामारीपासून आजतागायत ८० कोटींहून अधिक देशवासीयांना दरमहा मोफत धान्य मिळत आहे. संयुक्त राष्ट्रांनीही या योजनेचे कौतुक केले.

'उज्ज्वला योजना'ने १०.३ कोटी माता-भगिनींची चुलीच्या धुरापासून मुक्तता केली. त्यांचे डोळे आणि फुफ्फुसे वाचली. 'प्रधानमंत्री आवास योजना' अंतर्गत ४.२१ कोटी गरिबांना पक्के घर मिळाले. घर मिळणे म्हणजे केवळ चार भिंती नाहीत, तर सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळणे होय.

'जल जीवन मिशन' ही ग्रामीण भारतातील सर्वात मोठी क्रांती आहे. २०१४मध्ये केवळ ३.२३ कोटी म्हणजे १७ टक्के ग्रामीण घरांमध्ये नळाचे पाणी होते. मे २०२६ पर्यंत १४.७ कोटी म्हणजे ७६ टक्के घरांमध्ये 'हर घर जल' पोहोचले आहे. माता-भगिनींची डोक्यावर हंडा घेऊन होणारी पायपीट थांबली. 'आयुष्मान भारत' योजनेने ५५ कोटी लोकांना ५ लाखांचे आरोग्य कवच दिले. ६.८ कोटींहून अधिक लोकांनी मोफत उपचार घेतले आणि दारिद्र्यरेषेखाली जाण्यापासून वाचले. 'स्वच्छ भारत मिशन'ने १२ कोटी शौचालये बांधून देश हागणदारीमुक्त केला. हे देशाच्या लेकी-सुनांच्या इज्जतीचे रक्षण होते.

**आर्थिक सशक्तीकरण आणि डिजिटल क्रांती**

'डिजिटल इंडिया'ने जगाला भारताची ताकद दाखवून दिली. आज भारतातील UPI व्यवहार जगातील एकूण रिअल टाईम व्यवहारांच्या ४६ टक्के आहेत. मे २०२६ मध्ये २२४३ कोटी UPI व्यवहार झाले. भाजीवाल्यापासून ते मोठ्या शोरूमपर्यंत सगळे डिजिटल झाले आहेत. 'जनधन-आधार-मोबाईल' या JAM त्रिमूर्तीने ५२ कोटींहून अधिक जनधन खाती उघडली. DBT म्हणजेच थेट लाभ हस्तांतरणामुळे ३४ लाख कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या खात्यात गेले. यामुळे २.७ लाख कोटी रुपयांची बचत झाली जी पूर्वी भ्रष्टाचारात जायची.

'मेक इन इंडिया' आणि 'पीएलआय' योजनेने भारताला उत्पादनाचे केंद्र बनवले. आज भारत जगातील दुसरा सर्वात मोठा मोबाईल उत्पादक देश आहे. ॲपल कंपनीचे २५ टक्के आयफोन भारतात बनतात. संरक्षण क्षेत्रातील आयात ६० टयांनी कमी झाली आहे. INS विक्रांत, तेजस लढाऊ विमान, ब्रह्मोस क्षेपणास्त्र हे 'आत्मनिर्भर भारता'चे प्रतीक आहेत. संरक्षण निर्यात २१,००० कोटींच्या पुढे गेली आहे.

'स्टार्टअप इंडिया'मुळे १.४७ लाख स्टार्टअप्स नोंदणीकृत झाले आहेत. ११५ युनिकॉर्नसह भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. 'मुद्रा योजना'ने ४५ कोटी छोट्या उद्योजकांना २८ लाख कोटींचे कर्ज दिले. यातील ६९ टक्के लाभार्थी महिला आहेत. 'पीएम किसान सन्मान निधी'मधून ११ कोटी शेतकऱ्यांना दरवर्षी ६००० रुपये मिळत आहेत. आतापर्यंत ३.४ लाख कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत.

**राष्ट्रीय सुरक्षा आणि विश्वगुरू भारत**

२०१४ पूर्वी देश दहशतवादी हल्ल्यांनी पोखरला होता. उरी हल्ल्यानंतर सर्जिकल स्ट्राइक आणि पुलवामानंतर एअर स्ट्राइक करून भारताने दाखवून दिले की 'हा नवा भारत आहे, घरात घुसून मारतो'. कलम ३७० आणि ३५-A रद्द करून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना खरी श्रद्धांजली वाहिली गेली. आज काश्मीरमध्ये पर्यटन आणि गुंतवणुकीचे विक्रम मोडत आहेत. दगडफेक पूर्णपणे बंद झाली आहे.

परराष्ट्र धोरणात भारताची पत कमालीची वाढली आहे. G२० अध्यक्षपदाचे यशस्वी नेतृत्व करून 'वसुधैव कुटुंबकम'चा नारा जगाने स्वीकारला. 'व्हॅक्सीन मैत्री'अंतर्गत १०० हून अधिक देशांना लस पुरवून भारताने मानवतेचा धर्म पाळला. चंद्रयान-३ ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरून इतिहास घडवला. आदित्य L१ सूर्याचा अभ्यास करत आहे. आज क्वाड, ब्रिक्स, SCO सारख्या प्रत्येक महत्त्वाच्या व्यासपीठावर भारताशिवाय निर्णय होत नाहीत.

**सांस्कृतिक पुनरुत्थान आणि वारसा**

५०० वर्षांच्या संघर्षानंतर अयोध्येत प्रभू श्रीरामांचे भव्य मंदिर उभे राहिले. काशी विश्वनाथ कॉरिडॉर, महाकाल लोक, केदारनाथ-बद्रीनाथ पुनर्विकास यामुळे आपला आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा पुन्हा वैभवशाली झाला आहे. नवीन संसद भवन, कर्तव्यपथ यामुळे गुलामीच्या मानसिकतेला तिलांजली मिळाली. नेताजी सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचा यथोचित गौरव झाला.

अमृत काळातून विकसित भारताकडे १२ वर्षांपूर्वी भारत जगातील 'फ्रॅजाईल फाईव्ह' अर्थव्यवस्थांपैकी एक होता. आज आपण ४.२ ट्रिलियन डॉलरसह जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहोत. लवकरच आपण जर्मनीला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर जाऊ. जागतिक बँकेच्या मते, २५ कोटी भारतीय बहुआयामी गरिबीतून बाहेर आले आहेत. अत्यंत गरिबीचे प्रमाण १२ टक्क्यांवरून दोन टक्क्यांपेक्षा कमी झाले आहे. पंतप्रधान मोदी यांनी २०४७पर्यंत 'विकसित भारता'चा संकल्प सोडला आहे. ग्रीन हायड्रोजन मिशन, सेमीकंडक्टर मिशन, नॅशनल क्वांटम मिशन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स मिशन यातून भारत भविष्यातील तंत्रज्ञानात आघाडी घेईल.

२५ मे हा दिवस केवळ एका सरकारच्या तपपूर्तीचा नाही. हा दिवस आहे १४० कोटी देशवासीयांच्या आशा-आकांक्षांचा, त्यांनी दाखवलेल्या विश्वासाचा आणि त्या विश्वासाला सार्थ ठरवणाऱ्या कर्तृत्वाचा. 'मोदी है तो मुमकिन है' हे आता केवळ घोषवाक्य राहिलेले नाही. ती काळ्या दगडावरची रेघ आहे. एक तप पूर्ण झाले आहे. आता पुढचे तप 'विकसित भारता'च्या स्वप्नपूर्तीसाठी, कारण हा नवा भारत थांबणार नाही, थकणार नाही आणि झुकणारही नाही.

(साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

# रॉयल एनफिल्डची इलेक्ट्रिक बाईक 'फ्लाइंग फ्ली C६'

रॉयल एनफील्डने आपली पहिली इलेक्ट्रिक बाईक 'फ्लाइंग फ्ली C६' लॉन्च केली आहे. तिची एक्स-शोरूम किंमत ₹२.७९ लाख आहे. तथापि, कंपनीने 'बॅटरी एज अ सर्विस'चा पर्याय देखील दिला आहे.



फ्लाइंग फ्ली C६ ला कंपनीने युनिक आणि रेट्रो-फ्यूचरिस्टिक लुक दिला आहे. यात गर्डर फोर्क सस्पेंशनचा वापर केला आहे, जे आजकालच्या बाईक्समध्ये खूप कमी पाहायला मिळते.कंपनीने ही बाईक फक्त १२४ किलोची ठेवली आहे जेणेकरून चांगली रेंज मिळू शकेल. यात १९-इंचचे मोठी चाके आणि पातळ टायर आहेत. यामुळे रोलिंग रेझिस्टन्स कमी होतो आणि बॅटरी कमी खर्च होते.

यात ३.९१kWh चा बॅटरी पॅक देण्यात आला आहे. कंपनीचा दावा आहे की, एकदा पूर्ण चार्ज झाल्यावर ही १५४ किमीपर्यंत धावेल. यात बसवलेली मोटर ६०Nm चा टॉर्क जनरेट करते.ही बाईक केवळ ३.७ सेकंदात ० ते ६० किमी/तास वेग पकडते. याची टॉप स्पीड ११५ किमी/तास सांगितली आहे.

चार्जिंग तंत्रज्ञानः २ तासांत पूर्ण चार्ज, मोबाइल ॲपवरून वेग नियंत्रित करता येईल

या इलेक्ट्रिक बाईकला १००% पर्यंत चार्ज होण्यासाठी २ तास १६ मिनिटे लागतात, तर ८०% पर्यंत ती फक्त १ तास ५ मिनिटांत चार्ज होते. विशेष म्हणजे, रायडर मोबाइल ॲपद्वारे आपल्या सोयीनुसार चार्जिंगचा वेग देखील ठरवू शकतो.

सुरक्षितता आणि वैशिष्ट्येः ५ रायडिंग मोड्स आणि कॉर्नरिंग ट्रॅक्शन कंट्रोलराइड सुरक्षित आणि सोपी बनवण्यासाठी यात ३.५-इंचचा कलर TFT डिस्प्ले देण्यात आला आहे. बाईकमध्ये ५ रायडिंग मोड्स- सिटी, रेन, हायवे, स्पोर्ट आणि कस्टम मिळतात.

याव्यतिरिक्त, यात ॲडजस्टेबल रीजनरेटिव्ह ब्रेकिंग, लीन-सेन्सिटिव्ह ट्रॅक्शन कंट्रोल आणि ड्युअल-चॅनल एबीएस (ABS) सारखी आधुनिक वैशिष्ट्ये दिली आहेत. याचे मागील एबीएस (ABS) बंद देखील करता येते, जे ऑफ-रोडिंगमध्ये उपयुक्त ठरेल.

ग्राउंड क्लिअरन्स आणि सीटची उंचीः ॲडव्हेंचर बाईकसारखा अनुभवबाईकची सीटची उंची ८२३ मिमी आहे. यात २०७ मिमीचा ग्राउंड क्लिअरन्स दिला आहे, जो सामान्यतः ॲडव्हेंचर बाईक्समध्ये आढळतो. मोटर आणि बॅटरी एकाच मॅग्नेशियम केसिंगमध्ये ठेवल्या आहेत.

# नाटककार राम गणेश गडकरी



## निमित्त

राम गणेश गडकरी यांचा आज जन्मदिन. (२६ मे १८८५-२३ जानेवारी १९१९). गडकरी हे श्रेष्ठ नाटककार, विनोदकार आणि कवी होते. त्यांनी कवितालेखन 'गोविंदग्रज' या नावाने केले. विनोद लेखन 'बाळकराम' या नावाने केले. जन्म गुजरात राज्यातील नवसारी येथे झाला.


शिक्षण दामनगर (सौराष्ट्र), कर्जत आणि पुणे येथे महाविद्यालयीन पहिल्या वर्षापर्यंत (१९१२) झाले. त्यापूर्वी काही काळ त्यांनी किर्लोस्कर नाटक कंपनीच्या नाटकांत कामे करणार्या मुलांचे मास्तर म्हणून काम केले. तेथे काही मतभेद झाल्यानंतर विदर्भातील बाळापूर या गावी ते काही दिवस शिक्षक होते. तसेच पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाचे काम केले. १९१०मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीशी नाटकासाठी पदे रचण्याच्या निमित्ताने त्यांचा संबंध आला. त्यानंतर त्यांनी सर्वस्वी लेखानावरच आपला चरितार्थ चालविला.

वयाच्या सतराव्या वर्षी लिहिलेले मित्रप्रीती हे त्यांचे पहिले नाटक अनुपलब्ध आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या नाटकांचा आणि विनोदी लेखनाचा प्रभाव त्यांच्यांवर संस्कारक्षम वयातच पडला. नाट्यविनोदाच्या संदर्भात ते श्रीपाद कृष्णांना आपले गुरू मानीत असत. त्यांचे पहिले पुस्तक कोल्हटकरांच्या नाटकांतील उताऱ्यांचे आहे (१९०७). वेड्यांचा बाजार हे त्यांचे अपूर्ण नाटक महाराष्ट्रातील एक विख्यात नट आणि गडकऱ्यांचे एक निकटचे मित्र चिंतामणराव कोल्हटकर यांनी पूर्ण केले व ते १९२३मध्ये प्रकाशित झाले.

काव्यलेखानाच्या बाबतीत ते स्वतःस केशवसुतांचे 'कट्टे चेले' म्हणवीत. त्यांच्या काव्याची प्रकृती मात्र केशवसुतांच्या काव्याहून भिन्न आहे. 'अल्लड प्रेमास' (१९०९) ही गडकरींची प्रसिद्ध झालेली पहिली कविता. मासिक मनोरंजनात ती प्रसिद्ध झाली. ह्याच मासिकातून १९१३-१५मध्ये त्यांचे विनोदी लेख प्रसिद्ध झाले. हे लेख पुढे रिकामपणाची कामगिरी (१९२१) या नावाने प्रसिद्ध झाले. रंगभूमी या मासिकात 'सवाई नाटकी' या टोपण नावाने आणि कधीकधी निनावी लेखन गडकरी करीत असत.

प्रेमसंन्यास (१९१३) हे त्यांचे रंगभूमीवर आलेले पहिले नाटक. त्यानंतरची त्यांची नाटके अशी : पुण्यप्रभाव (१९१७), एकच प्याला (१९१९), भावबंधन (१९२०) व राजसंन्यास (१९२२, अपूर्ण). वाग्वैजयंती (१९२१) ह्या नावाने त्यांच्या कविता संगृहीत केलेल्या आहेत. त्यांचे समग्र विनोदी लेख संपूर्ण बाळकराम (१९२५) या नावाने प्रसिद्ध झाले. याशिवाय गडकरींचे बराच काळ अप्रकाशित राहिलेले साहित्य अप्रकाशित गडकरी (१९६२) या नावाने प्रल्हाद केशव अत्रे यांनी संपादित केले आहे. गडकऱ्यांच्या लेखनसंकल्पांची त्यावरून कल्पना येते. मृत्यूसमयी ते विदर्भातील सावनेर या गावी होते. ते क्षयाने आजारी होते. वयाच्या ३४व्या वर्षी त्यांचे निधन झाले. भावबंधन या नाटकाचा अखेरचा प्रवेश लिहिल्यानंतर थोड्या वेळाने त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. गडकरींचे साहित्य अल्प असले तरी मराठी मनावरील त्यांचा प्रभाव मात्र अपूर्व असून तो त्यांच्या मृत्यूनंतरही टिकून आहे. त्यांच्या कवितेत भावोत्कटता व कल्पनाचमत्कृती यांचा एकाच वेळी प्रत्यय येतो. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# तुमच्या नकळत या सवयी करतात किडनी निकामी

आपल्या शरीरातील सर्वात महत्त्वाच्या अवयवांपैकी एक म्हणजे मूत्रपिंड (Kidney). शरीरातील अतिरिक्त पाणी आणि विषारी पदार्थ बाहेर टाकणे, रक्त शुद्ध करणे आणि रक्तदाब नियंत्रित ठेवणे यांसारखी अनेक आवश्यक कार्ये किडनी करत असते. पण आपल्या दैनंदिन जीवनातील काही छोट्या आणि नकळत होणाऱ्या चुकांमुळे किडनीचे गंभीर नुकसान होऊ शकते.




जर तुम्हाला निरोगी आणि तंदुरुस्त राहायचे असेल, तर या सवयी वेळेवर ओळखून त्या बदलणे अत्यंत महत्त्वाचे आहे. चला तर मग, जाणून घेऊया अशा ६ सामान्य सवयी ज्या तुमच्या किडनीसाठी घातक ठरू शकतात.

किडनीचे नुकसान करणाऱ्या 'या' ६ सवयी

१. कमी पाणी पिणे-पाणी आपल्या किडनीसाठी इंधनासारखे काम करते. जेव्हा तुम्ही पुरेसे पाणी पीत नाही, तेव्हा किडनीला शरीरातील अशुद्धी आणि विषारी पदार्थ बाहेर टाकणे कठीण जाते. यामुळे किडनी स्टोनचा धोका वाढतो. त्यामुळे दिवसभरात किमान २ ते ३ लिटर (८ ते १० ग्लास) पाणी पिणे आवश्यक आहे.

२. आहारात मिठाचा अतिवापर-मीठातील सोडियममुळे रक्तदाब वाढतो. उच्च रक्तदाबाचा थेट परिणाम किडनीच्या कार्यक्षमतेवर होतो आणि तिची गाळण्याची क्षमता कमकुवत होते. दीर्घकाळ जास्त मीठ खाल्ल्याने किडनी निकामी होण्याचा धोका वाढतो. यासाठी जंक फूड, प्रक्रिया केलेले (Processed) पदार्थ टाळा आणि जेवणावर वरून मीठ घेण्याची सवय सोडा.

३. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वेदनाशामक (Painkillers) औषधे घेणे-डोकेदुखी, पाठदुखी किंवा अंगदुखी झाल्यावर डॉक्टरांचा सल्ला न घेता लगेच वेदनाशामक गोळ्या घेणे ही आजकाल सर्रास सवय झाली आहे. परंतु, या औषधांच्या अतिवापरामुळे किडनीच्या पेशींचे गंभीर नुकसान होऊ शकते. अत्यंत आवश्यक असल्याशिवाय आणि डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय पेनकिलर्स घेणे टाळा.

४. लघवी बराच वेळ रोखून धरणे

कामाचा ताण किंवा आळसामुळे अनेकदा लोक लघवी रोखून धरतात. ही अत्यंत धोकादायक सवय आहे. असे केल्याने मूत्रमार्गात जिवाणूंची वाढ होते, ज्यामुळे युरिन इन्फेक्शन आणि किडनीवर अतिरिक्त ताण निर्माण होऊन संसर्गाचा धोका वाढतो.

# रायगडात ६५ टँकरद्वारे पाणीपुरवठा

## ६४ गावे, २३० वाड्यांतील लाखो नागरिकांना दिलासा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद रायगडच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत विविध तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. २५ मेअखेर जिल्ह्यात एकूण ६५ टँकर कार्यरत असून त्याद्वारे ६४ गावे व २३० वाड्यांमधील १ लाख १३ हजार ७०१ नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे.




जिल्ह्यातील सर्व टँकर खासगी स्वरूपातील असून शासकीय टँकर अथवा मदतीचे टँकर कार्यरत नाहीत. सर्वाधिक टंचाईग्रस्त परिस्थिती पेण तालुक्यात असून येथे नऊ गावे व ७६ वाड्यांसाठी १२ टँकर कार्यरत आहेत. या माध्यमातून २४ हजार ७४६ नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे. महाड तालुक्यात १४ गावे व ८७ वाड्यांसाठी नऊ टँकरद्वारे २२ हजार २४३ नागरिकांना पाणीपुरवठा सुरू आहे. पनवेल तालुक्यात १० गावे व आठ वाड्यांसाठी नऊ टँकरद्वारे १८ हजार ५५३ नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे. कर्जत तालुक्यात तीन गावे व ११ वाड्यांसाठी आठ टँकर, खालापूर तालुक्यात पाच गावे व नऊ वाड्यांसाठी सहा टँकर, तर माणगाव तालुक्यात चार गावे व १५ वाड्यांसाठी पाच टँकर कार्यरत आहेत.

याशिवाय अलिबाग तालुक्यात चार गावे, उरण तालुक्यात चार वाड्या, सुधागड-पाली तालुक्यात दोन वाड्या, रोहा तालुक्यात तीन गावे, पोलादपूर तालुक्यात पाच गावे व १४ वाड्या, म्हसळा तालुक्यात सहा गावे व एक वाडी तसेच श्रीवर्धन तालुक्यात एक गाव व तीन वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषदेकडून पाणीटंचाईग्रस्त भागांवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. नागरिकांना नियमित व सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# पनवेल-कर्जत रेल्वे मार्गिकेच्या कामाची आज खासदार श्रीरंग बारणे करणार पाहणी

**कर्जत : प्रतिनिधी**

पनवेल ते कर्जत नवीन रेल्वे मार्गिका प्रकल्पाच्या कामाने वेग घेतला असून प्रकल्पाचे सुमारे ९५ टक्के काम आता पूर्ण झाले आहे. या मार्गिकेच्या सर्व स्थानकांची मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे मंगळवारी (दि. २६) रेल्वे अधिकाऱ्यांसह पाहणी करणार आहेत. रेल्वे विभागाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन खासदार श्रीरंग बारणे मंगळवारी सकाळी पाहणी दौरा करणार आहेत. कर्जत येथील रेल्वे कॉरिडॉरचीही या वेळी पाहणी केली जाणार आहे.

खासदार बारणे यांनी सांगितले की, कर्जत-पनवेल रेल्वेमार्ग हा मुंबई महानगर प्रदेशातील एक अत्यंत महत्त्वाचा उपनगरीय रेल्वे प्रकल्प आहे. २९.६ किलोमीटर लांबीचा हा दुहेरी मार्ग कर्जत आणि पनवेल या दोन शहरांना थेट जोडणार असून यामुळे प्रवासाचा वेळ आणि गर्दी लक्षणीयरीत्या कमी होईल. मुंबई रेल्वे विकास महामंडळाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ (एमयूटीपी ३) अंतर्गत पनवेल ते कर्जत दुहेरी रेल्वे मार्गिका उभारण्याचे काम हाती घेतले आहे.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

# स्वतःच्या विहिरीतून ग्रामस्थांना पाणी; रमेश कासार यांचा सेवाभाव

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्याचे तापमान सध्या ३९ ते ४० डिग्री सेल्सिअस आहे. त्यामुळे गावातील नदीनाले, विहिरीसुद्धा आटल्या आहेत. अशा बिकट परस्थितीमध्ये काशीद गावातील रमेश सखाराम कासार हे गावकऱ्यांना पाणी मिळवून देण्यासाठी धावून आले आहेत.



मुरुड तालुक्यातील काशीद हे सुप्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. येथे असंख्य पर्यटक येत असतात. विहिरीच्या पाण्याची पातळी खाली गेल्याने मोठी पाणीटंचाई निर्माण झाली होती. अशा बिकट परस्थितीमध्ये गावचे ग्रामस्थ रमेश कासार हे धावून आले.

त्यांच्या मालकीच्या विहिरीमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध होता. त्यांनी सर्वांना आपल्या विहिरीमधून पाणी देण्यास सुरुवात केली. त्यांनी परवानगी दिल्यामुळे गावातील बहुसंख्य लोकांना मुबलक पाणी मिळून पाणीटंचाई दूर झाली. गावातील बहुतेक विहिरी आटल्या आहेत.

# 'आयुष'साठी शासन सुविधेबरोबरच सीएसआर फंडही!

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूडसारख्या ग्रामीण भागात मल्टिनॅशनल हॉस्पिटल असणे आवश्यक आहे. शासनाच्या विविध योजना हॉस्पिटलला लागू झाल्या आहेत. आज हॉस्पिटल सुसज्ज होत आहे. सर्व सोयीसुविधांयुक्त असे हॉस्पिटल असल्याने रुग्ण बरा झाल्याशिवाय जाणार नाही. अनुभवी डॉक्टर व तत्पर सेवा यामुळे भविष्यात या हॉस्पिटलचा नावलौकिक वाढणार आहे. आयुष्य हॉस्पिटलला शासनाच्या सर्व सुविधांबरोबरच सीएसआर फंडही उपलब्ध करून देणार असल्याचे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले.



नांदगाव येथील आयुष्य हॉस्पिटल येथे महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेच्या शुभारंभ सोहळ्याचे लोकार्पण आमदार दळवी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या वेळी तटरक्षक दलाचे कमांडंट जयदीप पॉल, जंजिरा मेडिकल असोसिएशन अध्यक्ष डॉ. संजय पाटील, आयुष हॉस्पिटलचे संस्थापक रामलिंग माळी, डॉ. नूतन माळी, वैद्यकीय संचालक डॉ. अनिल कुमार गोस्वामी, डॉ. ऋतूज माळी, डॉ. अभिजित फासे, ॲड विलास नाईक, रायगड जिल्हा परिषद सदस्या ज्योती नागावकर, माजी सभापती रमेश नागावकर, शिवसेनेचे रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, शिवसेनेचे मुरुड तालुका बांधकाम विभागप्रमुख दिनेश मिणमिणे, राजपुरी जिल्हा परिषद संपर्क प्रमुख जीविता मिणमिने, शिवसेनेच्या जिल्हा महिला संघटिका तृप्ती पाटील, उपसभापती जंगम, महेश मापगावकर, यशवंत पाटील, मुरुड शहर अध्यक्ष दर्शन काळबेरे, नगरसेवक आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार दळवी म्हणाले, नुकतेच जिल्हा रुग्णालयासाठी सव्वाचार कोटींचा निधी उपलब्ध करून दिला. ग्रामीण भागात सर्वसामान्य रुग्णांना शासकीय आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे ही अतियश महत्त्वाची बाब आहे. सर्व सोयींनी परिपूर्ण असलेल्या या हॉस्पिटलमधून विविध शासकीय योजनांचा लाभ जनतेने घ्यावा. सुपर स्पेशॅलिटी आयुष हॉस्पिटलच्या माध्यमातून उत्तम आरोग्यसेवा मिळेल, असा विश्वासही आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केला.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील **दत्तात्रय विठ्ठल दाभणे** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

शेतजमिनीचे वर्णन
मौजे तुरमाळे, तालुका पनवेल, जि. रायगड.

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| दत्तात्रय विठ्ठल दाभणे | १६ | १ | ०-३७-०० पैकी खरेदी क्षेत्र ०-१८-५० हे.आर.चौ.मी. | २.१९ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : २६/०५/२०२६**

**सही/-**
**ॲड विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat४३@gmail.com

# रानवडेत विशाल हिंदू संमेलन उत्साहात; पारंपरिक लाठीकाठी खेळाने जिंकली उपस्थितांची मने

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील रानवडे येथे सकल हिंदू समाज समिती व साई मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले भव्य हिंदू संमेलन बुधवारी (दि.२०) अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. हिंदू समाजामध्ये जनजागृती, सामाजिक ऐक्य व सनातन संस्कृतीबद्दल जागर निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते शिक्षणप्रेमी गजानन अधिकारी, सुजित शिंदे, पंचक्रोशीतील सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, परिसरातील ग्रामस्थ, युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व भारतमाता पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या संमेलनात प्रमुख वक्ते म्हणून पाली येथील व्याख्याते धनंजय सुभाष गद्रे, पंचपरिवर्तनच्या व्याख्यात्या ज्योती उत्तम घाटील तसेच माणगाव येथील व्याख्याते अजित मारुती शेडगे यांनी प्रभावी मार्गदर्शन केले. हिंदू समाजाचे संघटन, संस्कार, सामाजिक जबाबदारी व युवकांनी समाजकार्यात पुढे येण्याची गरज यावर त्यांनी आपल्या भाषणातून उपस्थितांना प्रेरित केले.

तसेच या वेळी सेवा सहयोग फाउंडेशनच्या वतीने किशोरी विकास प्रकल्पांतर्गत पारंपरिक लाठीकाठीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. चंद्रकांत अधिकारी सर यांनी बनाटी प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अशोक सावंत यांनी भूषविले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. "एकत्र येऊया, एकत्र राहूया, बलशाली हिंदुस्थान घडवूया" हा संदेश या संमेलनातून या वेळी देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद लाड यांनी केले, तर प्रास्ताविक दीपक गावडे यांनी केले.

# कच्च्या रस्त्यामुळे नागरिक त्रस्त

**मुरूड : प्रतिनिधी**

खाजणी पूल ते मांदाड रस्त्याला मोठे भगदाद पडले असून पावसाळ्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पावसाळ्यात या रस्त्याची दयनीय अवस्था होत असते. हा रस्ता सुस्थितीत करावा, अशी मागणी येथील स्थानिक नागरिकांसह पर्यटक करीत आहेत.

रस्ता चौपदरी असल्याने मुरुडला येणारा पर्यटक वर्ग अलिबाग मार्गे न येता इंदापूर मार्गाने येणे पसंत करतात, परंतु या रस्त्यावर धुळीचे लोट अंगावर घेत वाहनचालकांना प्रवास करावा लागतो.

# कोकणचा राजा आंबा, पण आता प्रक्रिया उद्योगाची नितांत आवश्यकता

रायगड जिल्ह्याची ओळख हापूस आंब्याशिवाय अपूर्ण आहे. कर्जत, खालापूर, पेण, अलिबाग, मुरुड, रोहा या पट्ट्यातील जमीन आणि हवामान हापूससाठी पोषक आहे. त्यामुळे इथल्या आंब्याला एक वेगळीच चव, सुगंध आणि गोडवा आहे. जीआय मानांकन मिळालेला हा आंबा केवळ फळ नाही, तर कोकणच्या शेतकऱ्याचा स्वाभिमान आहे. पण हाच राजा दरवर्षी हवामानाच्या लहरीपणामुळे, बाजारातील अनिश्चिततेमुळे आणि योग्य नियोजनाअभावी हवालदिल होतो. मार्च महिन्यात अवकाळी पाऊस आला की मोहोर गळून पडतो.

एप्रिल-मेमध्ये उष्णतेची लाट आली की फळाची वाढ खुंटते. कधी गारपीट होते, कधी ढगाळ वातावरणामुळे कैऱ्या गळतात. नैसर्गिक संकटांवर मात करून माल तयार झाला तरी बाजारात भाव मिळेलच याची शाश्वती नसते. हंगामाच्या सुरुवातीला ८०० ते १२०० रुपये डझन असलेला आंबा, मे महिन्याच्या शेवटी २०० रुपये डझनावर येतो. शेतमाल नाशवंत असल्याने मिळेल त्या भावात विकावा लागतो. यंदा हापूसचे उत्पादन चांगले झाले तरी निर्यातीसाठी आवश्यक असलेले 'व्हीएचटी प्लांट' लासलगाव किंवा वाशी येथेच आहेत. त्यामुळे रायगडच्या शेतकऱ्याला वाहतूक खर्च आणि वेळ दोन्ही जास्त मोजावा लागतो. अनेकदा निर्यातीचे निकष पूर्ण न झाल्याने परदेशात माल पाठवता येत नाही आणि देशांतर्गत बाजारात भाव पडतो. या सगळ्या समस्यांवर एकच कायमस्वरूपी तोडगा आहे, तो म्हणजे आंबा प्रक्रिया उद्योग.



आज रायगडात हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच प्रक्रिया उद्योग आहेत. पल्प, लोणचे, जॅम, ज्यूस, आमरस, आंबापोळी, मँगो बार, आंबा वडी यांना वर्षभर मागणी असते. लग्नसराई, सणासुदीला याचे दर चढे असतात. पण हंगामात आपण आंबा स्वस्तात विकतो आणि नंतर हेच पदार्थ चढ्या भावाने विकत घेतो. ही परिस्थिती बदलायची असेल तर गावपातळीवर प्रक्रिया उद्योग उभे राहिले पाहिजेत. जिल्ह्यातील महिला बचत गट हे मोठे बळ आहे.

त्यांना अन्न प्रक्रिया, पॅकेजिंग, एफएसएसएआय परवाना, ब्रँडिंग यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. कृषी विभाग, एमएसएमई विभाग आणि नाबार्ड यांच्या योजनांतून ५० ते ८० टक्के अनुदान मिळू शकते. प्रत्येक तालुक्यात किमान एक 'आंबा क्लस्टर' विकसित करावा. या क्लस्टरमध्ये प्री-कूलिंग, कोल्ड स्टोरेज, रायपनिंग चेंबर, पल्प युनिट, पॅक हाऊस या सर्व सुविधा एकाच छताखाली मिळतील. शेतकऱ्याने फक्त माल आणून द्यायचा, त्यावर प्रक्रिया करून, ब्रँडिंग करून विक्रीची जबाबदारी क्लस्टरची असेल. पेण तालुक्यातील काही तरुणांनी एकत्र येऊन 'कोकण फ्रूट प्रोसेसिंग' नावाने कंपनी सुरू केली आहे. ते आंब्यासोबतच फणस, करवंद, जांभूळ, काजू बोंड यांवरही प्रक्रिया करतात. त्यांचे प्रॉडक्ट्स थेट मुंबई-पुण्यातील नामांकित मॉल्समध्ये आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर विकले जातात. त्यांनी 'फार्मर टू कस्टमर' ही साखळी तयार केली आहे. दलालांना बाजूला करून शेतकऱ्याला चांगला भाव मिळवून दिला आहे. असे मॉडेल संपूर्ण रायगडात राबवता येईल. जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेऊन 'रायगड हापूस ब्रँड' तयार करावा. या ब्रँडखाली सर्व प्रक्रिया केलेले पदार्थ एकत्रितपणे विकले जावेत. जेएनपीटी बंदराचा फायदा घेऊन थेट आखाती देश, युरोप, अमेरिकेत निर्यात करता येईल. विमानतळ सुरू झाल्यानंतर तर कार्गोने पाठवणे अधिक सोपे होईल.

आंबा महोत्सव फक्त अलिबाग किंवा मुंबईत न भरवता दुबई, लंडन, न्यूयॉर्क येथेही भरवता येईल. शाळकरी मुलांना शेतीची आवड निर्माण व्हावी म्हणून 'शाळा तेथे आंबा बाग' उपक्रम राबवता येईल. कृषी पर्यटनाला चालना देऊन पर्यटकांना थेट बागेत आंबा काढणे, पाडाला रस काढणे, आंबापोळी बनवणे या अनुभव देता येतील. यातून शेतकऱ्याला अतिरिक्त उत्पन्न मिळेल. हापूस आंबा हे रायगडचे सोने आहे. (साभार : इंटरनेट)

**भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत**

**शुध्दीपत्र**

मौजे-पनवेल, ता. पनवेल, लोकमान्य बाळगंगाधर टिळकमार्ग (जयभारत नाका-अन्नपुर्णा ते स्वातंत्र्यवीर सावरकर चौक) रस्ता रुंदीकरण करणेकामी भुसंपादन कायदा भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९ अन्वये अधिसूचना दिनांक २५/११/२०२५ रोजी प्रसिध्द केलेली आहे. सदर अधिसूचनेमध्ये न.भू. क्र. ५०२ संपादित क्षेत्र १८७.३० चौ. मी. असे नमूद केले आहे.

त्याऐवजी

न. भू. क्र. ५०२ संपादीत क्षेत्र ४५.२५ चौ. मी. असे वाचण्यात यावे.

**सही/-**
**(पवन चांडक)**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उप विभाग पनवेल**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No :- EE/EHV (O &M) / DIVN/MHD/Tech/ E-Tender-13/2026-27 Dtd.26.05.2026 RFx No.- 7000040064** | **Sub:-** Invitation for SRM E-Tender for providing Closing and Tripping Coil for various makes of CB at 220 kV Kandalgaon Ss,220 kV Vilebhagad Ss,100 kV Roha and 100 kV Mhasala Substation under EHV (O&M) Division Mahad. | **Rs. 4,85,496/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST. Bid submission is from **26.05.2026 @ 00:00 hrs to 09.06.2026 @ 23:59 Hrs** for above tender. For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.8793505100

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn, Mahad**

# डेटा सेंटर, परदेशी गुंतवणुकीसाठी नवी मुंबईत उद्योग विस्तार

## एमआयडीसीकडून जमीन संपादनासाठी हालचाली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रात डेटा सेंटर आणि परदेशी गुंतवणुकीला गती देण्यासाठी नवी मुंबईतील ठाणे-बेलापूर तसेच तळोजा औद्योगिक पट्ट्यात एमआयडीसीने जमीन संपादनाची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरू केली आहे.



नवी मुंबईतील महापे-शीळ आणि तळोजा औद्योगिक पट्ट्यात डेटा सेंटर व परदेशी गुंतवणुकीसाठी एमआयडीसीकडून नव्या जमिनींचे संपादन केले जाणार आहे. (प्रातिनिधिक जोडचित्र)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात डेटा सेंटर तसेच परदेशी गुंतवणुकीसाठी उत्सुक असलेल्या उद्योगांना त्वरीत जागा आणि वीज उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मुंबई महानगर प्रदेशातील ठाणे-बेलापूर तसेच तळोजा औद्योगिक पट्टयात या उद्योगांसाठी नव्या जागेच्या संपादनासाठी युद्धपातळीवर हालचाली सुरु केल्या आहेत.

ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयातील शीळ-महापे रस्त्यास लागून असलेल्या १४ गावांमधील २५ एकर तर पनवेल तालुक्यात ४२० एकर इतक्या विस्तीर्ण जागेचे संपादन या उद्योगांसाठी करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रक्रियेत राज्याचा उद्योग विभाग आणि एमआयडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांना सक्रिय करण्यात आले असून यामध्ये कोणताही राजकीय हस्तक्षेप रहाणार नाही याची पुरेपूर दक्षता घेतली जात आहे.

डेटा सेंटर क्षेत्रातील जगभरातील अनेक नामांकित कंपन्या राज्यात गुंतवणुकीसाठी उत्सुक असल्याचा दावा राज्य सरकारकडून सातत्याने केला जात आहे. या कंपन्यांच्या प्रकल्प उभारणी संबंधी अत्यावश्यक कामे तसेच जमीनीची उपलब्धता कालबद्ध पद्धतीने पुर्ण केली जावी असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभागाला दिले आहेत.

महाराष्ट्रात आणि विशेषतः मुंबई महानगर प्रदेशातील औद्योगिक पट्टयात गुंतवणुकीसाठी डेटा सेंटर क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी यापुर्वीच प्रस्ताव सादर केले आहेत.

मुंबईस लागून असलेल्या ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयात डेटा सेंटर क्षेत्र तर तळोजा उद्योग पट्टयात अभियांत्रिकी क्षेत्रातील काही नामांकित कंपन्यांनी गुंतवणुक तसेच उद्योग वाढीचे प्रस्ताव सादर केले आहेत. नवी मुंबई विमानतळ तसेच उरण-न्हावाशेवा भागातील जवाहरलाल नेहरु बंदरापासून हे दोन औद्योगिक परिसर जवळ आहेत. असे असले तरी या दोन्ही औद्योगिक पट्टयातील मोकळ्या जागांना आता मर्यादा आल्या आहेत. डेटा सेंटर तसेच अभियांत्रिकी उद्योगातील कंपन्यांची मागणी लक्षात घेता राज्याच्या उद्योग विभागाने एमआयडीसीच्या माध्यमातून या संपूर्ण औद्योगिक परिक्षेत्राचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला असून नव्या जागेच्या संपादनाची प्रक्रिया युद्धपातळीवर सुरु करण्यात आली आहे.

**महापे-शीळ, तळोजा रस्त्यालगत जमीनीचे संपादन**

ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयातील महापे-शीळ तसेच तळोजा रस्त्यालगत असलेल्या १४ गावांपैकी बोरीवली परिसरात २५ एकर इतक्या विस्तीर्ण जमीनीचे संपादन करण्याचा निर्णय एमआयडीसीने घेतला आहे. या जमिनीच्या संपादनाच्या माध्यमातून ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयाचा विस्तार केला जाणार आहे. याशिवाय तळोजा औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्रमांक २ लगत मौजे चिंध्रण, महाळुंगी, कानपोली या भागातील ४२० एकर इतकी खासगी जमीन उद्योगांसाठी संपादित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एमआयडीसीने यंदाच्या अर्थसंकल्पात उद्योग विस्तार आणि जमीन संपादनासाठी नऊ हजार कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे. गेल्या काही वर्षांच्या तुलनेत ही तरतूद ३९६ टयांनी अधिक आहे. डेटा सेंटर आणि परदेशी गुंतवणुकीवर भर देत असताना मुंबईस लागूनच या उद्योगांसाठी या जमिनींच्या संपादनाचे धोरण आखण्यात आले आहे.

**ठाणे-बेलापूर पट्टा डेटा सेंटरचे केंद्र**

आशिया खंडातील सर्वात मोठा औद्योगिक पट्टा असलेल्या ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्राचे एकूण क्षेत्रफळ २३३३ हेक्टर इतके पसरले असून १९६१ ते १९६४ या काळात या भागात उद्योग उभारणीसाठी जमिनींचे संपादन करण्यात आले होते. सद्यस्थितीत या क्षेत्रात उद्योगांसाठी ६१३० भूखंड वितरीत करण्यात आले आहेत. त्यापैकी ५२५९ उद्योग सुरु आहेत. त्यापैकी ३३२६ अभियांत्रिकी उद्योग, १४७ रासायनिक, १३६१ भूखंडांवर सेवा उद्योग सुरु असून गेल्या काही वर्षात या पट्टयात माहिति तंत्रज्ञान तसेच डाटा सेंटरचे जाळे विस्तारु लागले आहे. सद्यस्थितीत याठिकाणी एनटीटी ग्लोबल, डाटास्केप रिॲलीटी, डाटा सेंटर डोल्डींग इंडिया, ग्रमसी टेक पार्क, ॲमनथीन इन्फो पार्क असे मोठे डेटा सेंटर्स सुरु झाले आहेत. याशिवाय रिलायन्स, माईड स्पेस, गिगाप्लेक्स, कॅपजेमीनी असे माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योगही या भागात आहेत.

**राजकीय हस्तक्षेपाला अटकाव**

डेटा सेंटर तसेच परदेशी गुंतवणुकीसाठी मुंबई लगत असलेल्या औद्योगिक पट्टयात जमीन संपादनासाठी गेल्या काही महिन्यांपासून राज्याचा उद्योग विभाग आणि एमआयडीसीने आक्रमक पाउले उचलण्यास सुरुवात केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या संपूर्ण प्रक्रियेविषयी कमालिचे आग्रही असल्याने एमआयडीसीतील जमीन संपादनात आणि भुखंड वाटपातील राजकीय हस्तक्षेपाला पद्धतशीरपणे अटकाव घातला जात असल्याचे विश्वसनिय वृत आहे. एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलासरु यांनी या वृत्तास दुजोरा दिला.

# वाशीतील धोकादायक इमारतींवर महानगरपालिकेची कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सी विभाग वाशी परिसरातील सी-१ प्रवर्गात (अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्काशीत करणे) घोषित करण्यात आलेल्या इमारतींवर महापालिकेकडून धडक कारवाई करण्यात आली आहे.

आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या आदेशान्वये व उपायुक्त संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सी विभाग कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त सुखदेव येडवे यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई राबविण्यात आली.

या मोहिमेंतर्गत खालील इमारतींवर कारवाई करण्यात आली आहे :१)जय महाराष्ट्र, जेएन-२ टाईप अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, भू. क्र. ४, सेक्टर ९, वाशी

(इमारत क्रमांक ३१ ते ४६ एकूण १६ इमारती)

२)लिटिल फ्लॉवर को. ऑप. हौ. सो. लि., जेएन-४ टाईप, इमारत क्रमांक ९, सेक्टर ९, वाशी

३)मे. नुर को. ऑप. हौ. सो. लि., प्लॉट नं. १८, सेक्टर ९A, वाशी, नवी मुंबई

४)डी टाईप अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, इमारत क्र. D-१ ते D-४, सेक्टर १, वाशी

या सर्वांचा पाणी पुरवठा व विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला.या कारवाईसाठी पाणी पुरवठा विभाग, विद्युत पुरवठा विभाग, अतिक्रमण विभागाचे अधिकारी/कर्मचारी तसेच अतिक्रमण पोलीस व स्थानिक पोलीस ठाण्याचे कर्मचारी उपस्थित होते.

नवी मुंबई महापालिकेने स्पष्ट केले आहे की, भविष्यातही अशा अतिधोकादायक व राहण्यास अयोग्य घोषित केलेल्या इमारतींवर कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार आहे. नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही मोहीम राबविल्याचे स्पष्ट केले आहे.

# सिडको सुरक्षारक्षकांच्या प्रामाणिकतेचे कौतुक

**नवी मुंबई : : प्रतिनिधी**

नवी मुंबईमधील सर्व रेल्वे स्थानकांवर नागरिकांच्या सुररक्षिततेसाठी सिडको महामंडळामार्फत सुरक्षा रक्षक मंडळाचे सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत. याच सुरक्षारक्षकांच्या कर्तव्य तत्परतेमुळे एका महिला प्रवाशाला तिची हरविलेली बॅग मिळाली आहे. कर्मचाऱ्यांच्या या कर्तव्य तत्परतेचे कौतुक होत आहे.



सोमवारी (ता.२५) तुर्भे रेल्वे स्टेशनवर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तैनात करण्यात आलेले आणि कर्तव्यावर असलेले डी.एस.सुरवसे (सुरक्षा पर्यवक्षक), आर.एम.पाटोल (सुरक्षा रक्षक), ए.जी.लोहट (महिला सुरक्षारक्षक) हे गस्त घालत असताना त्यांना एका महिला प्रवाशाची एक पर्स मिळाली. त्या पर्समध्ये सुमारे ७ ते ८ हजार रुपये रोख रक्कम व इतर महत्वाचे कागदपत्र आढळून आले आहे.

कर्तव्यावर असणाऱ्या सुरक्षारक्षकांनी त्या महिलेला संपर्क करुन त्याची शहानिशा करुन सदर महिलेला तिची पर्स, रोख रक्कम व इतर महत्वाची कागदपत्रे परत देऊन कर्तव्यदक्ष सुरक्षारक्षकांनी उत्कृष्ट कामगिरी केली. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्व सुरक्षारक्षकांचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी अभिनंदन करीत सिडकोकडून प्रशस्ती पत्र प्रदान करण्यात आले.

# महामार्गालगत बेघरांचे ठाण : स्वच्छ अभियानाला हरताळ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई शहरातील महामार्गालगतच बेघरांनी ठाण मांडल्याने अस्वच्छतेचे विद्रुप दर्शन घडत आहे. एका जागेवरून उठवल्यानंतर शहरातच बस्तान हलवणाऱ्या या बेघरांमुळे नेरूळ, सानपाडा, वाशी या भागाचे विद्रुपीकरण होत आहे. यामुळे अस्वच्छतेबरोबरच आरोग्यही धोक्यात असून यावर तत्काळ कारवाई करण्याची मागणी स्थानिक करत आहेत.



नवी मुंबई शहरात शीव-पनवेल महामार्गावरील बेलापूर हद्दीतून नवी मुंबईत प्रवेश करताच नेरूळ , सानपाडा व वाशी हे उड्डाणपुल लागतात. या उड्डाणपुलालगतच बेघरांची गर्दी पाहायला मिळत आहे. वाशी, बेलापूर, सीवूड्स, नेरूळ अशा उड्डाणपुलाखालील जागांवर बेघरांनी मोठ्या प्रमाणात आश्रय घेतला आहे. पालिकेने उड्डाणपुलाला लोखंडी कुंपण घातले तरीही बेघरांनी येथील पदपथाचा ताबा घेतला आहे. रस्त्यावरच जेवण बनवणे, उघड्यावर स्नान करणे, झोपणे यामुळे परिसराला बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. यामुळे देशातील स्वच्छ शहरात सातत्याने पहिल्या ३ क्रमांकात नंबर पटकावणारे हेच का ते शहर असा संताप नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

शीव-पनवेल महामार्गाच्या दुतर्फा वाहनांची वर्दळ असते. महामार्गावरील उड्डाणपुलाखालील जागेत बेघर आश्रय घेत असून ते परिसर अस्वच्छ करत आहेत. त्यामुळे पालिकेने वाशी, सानपाडा, नेरुळ येथील उड्डाणपुलाखालील जागा लोखंडी कुंपन लावून बंदीस्त केली आहे. तरीही सीवूड्स बेलापूर, नेरुळ येथील पूर्व पश्चिमेकडील उड्डाणपुलाखालील जागा, महामार्गावरील वाशी परिसर आणि पदपथ बेघरांनी ताब्यात घेतले आहेत. यामुळे शहर स्वच्छतेत बाधा येत आहे.

> **शहरातील विविध उड्डाणपुलाखालील बेघर कारवाईनंतर काही दिवसांत पुन्हा येतात. यामुळे 'जैसे थे' परिस्थिती निर्माण होते. पालिका सातत्याने कारवाई करत आहे. शहराला बाधा ठरणाऱ्या बाबींवर पुन्हा पुन्हा कारवाई केली जाणार आहे.**
> **-डॉ.अजय गडदे, उपायुक्त,**
> घनकचरा व्यवस्थापन विभाग

# उरण तालुका काँग्रेस अध्यक्ष विनोद म्हात्रे यांचा राजीनामा

**उरण : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांना पदावरून दूर केल्याने उरण तालुका काँग्रेसचे अध्यक्ष विनोद म्हात्रे यांनी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत त्यांच्या पदाचा राजीनामा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे २५ मे रोजी सुपूर्द केला आहे.

जिल्ह्यात पक्षातर्फे निरीक्षक आले, तेव्हा घेण्यात आलेल्या सभेमध्ये सर्वांनीच महेंद्र घरत हेच जिल्हाध्यक्ष पदावर पुढच्या कालावधीत असावेत अशी एकमुखी मागणी केली होती. घरत यांना जिल्हाध्यक्ष पदावरून दूर केल्याने सामान्य कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली आहे. त्यामुळे मी उरण तालुका अध्यक्षपदाचा राजीनामा देत असल्याचे म्हात्रे यांनी म्हटले आहे.



# अतिक्रमणविरोधी विभागाकडून घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण/अ.बां.नि.वि.) संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय घणसोली श्री. एकनाथ शांताराम पाटील, (घरमालक), स्व. चांगोशेठचौक, साळवीनगर, गोठवली, घणसोली, नवी मुंबई यांनी अनधिकृत बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्वपरवानगी न घेता सुरू केले होते. सदरील अनधिकृत बांधकामांस घणसोली विभागामार्फतनोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते. परंतू त्यांनी सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

सदर अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेकडून तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यानुसार सदरील अनधिकृत बांधकाम हटविणेपोटी १२ कामगार, ४ ब्रेकर, १ गॅसकटर सोबत या धडक मोहिमेसाठी घणसोली विभागासोबत बेलापूर विभाग व नेरुळ विभागातील अधिकारी / कर्मचारी आणि नमुंमपा पोलीस पथक तैनात होते. सदर अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करण्यात आली.यापूढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

# एनआरआय पाणथळ क्षेत्रात ड्रोन उडवण्यास बंदी; वनरक्षक तैनात



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सीवूड्स-नेरुळ परिसरातील एनआरआय पाणथळ क्षेत्रात फ्लेमिंगो आणि इतर स्थलांतरित पक्ष्यांना ड्रोनमुळे होणारा त्रास थांबवण्यासाठी वन विभागाने ठोस पावले उचलली आहेत. या परिसरात ड्रोन उडवण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली असून, सुरक्षेसाठी आणि देखरेखीसाठी सात वनरक्षकांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात आली आहे. 'लोकसत्ता'ने या समस्येकडे लक्ष वेधल्यानंतर वन विभागाने ही तातडीची अंमलबजावणी सुरू केली आहे.

गेल्या काही महिन्यांत समाज माध्यमांवरील रील आणि छायाचित्रणासाठी या परिसरात मोठ्या प्रमाणावर ड्रोनचा वापर वाढला होता. ड्रोनमुळे पक्ष्यांच्या अधिवासात, त्यांच्या प्रजननात आणि नैसर्गिक हालचालींना गंभीर धोका निर्माण होत असल्याचे वन्यजीव प्रेमींनी निदर्शनास आणून दिले होते.याची गंभीर दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या वन विभाग (कांदळवन कक्ष मुंबई, कांदळवन विभाग, उत्तर कोकण) आणि मॅन्ग्रोव्ह फाऊंडेशनतर्फे या परिसरात नवे कडक नियमावलीचे सूचना फलक लावण्यात आले आहेत.

त्यानुसार, वन्यजीव (संरक्षण) कायदा १९७२ च्या कलम ९ आणि कलम ५१ अन्वये वन्य प्राण्यांना इजा करणे किंवा त्यांचा अधिवास नष्ट करणे हा गंभीर स्वरूपाचा दंडनीय गुन्हा असून, उल्लंघन करणाऱ्यांवर याच कायद्यानुसार थेट कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.दरवर्षी हजारो परदेशी आणि स्थानिक स्थलांतरित पक्षी या पाणथळ जागेवर विसाव्यासाठी येतात. वन विभागाने घेतलेल्या या निर्णयाचे पर्यावरणप्रेमींनी स्वागत केले असून, या नियमांची वर्षभर सातत्याने अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

नागरिक थेट संपर्क साधू शकतात

वन विभागाने या परिसराच्या सुरक्षेसाठी वनपरिक्षेत्र अधिकारी, नवी मुंबई (कांदळवन विभाग, घणसोली) यांच्या वतीने नागरिकांसाठी संपर्क माध्यम खुले केले आहे. परिसरात नियमांचे उल्लंघन होत असल्यास नागरिक 'rfomnm@gmail.com' या ईमेलवर किंवा वन विभागाच्या १९२६ या २४ तास उपलब्ध असलेल्या 'हॅलो फॉरेस्ट' हेल्पलाइन क्रमांकावर थेट तक्रार नोंदवू शकतात.

**वन विभागाने जारी केलेले मुख्य निर्बंध**

ड्रोन उड्डाणास बंदी : परिसरात कोणत्याही प्रकारच्या ड्रोन कॅमेऱ्यांना परवानगी नसेल.

तलावात प्रवेशबंदी : पाण्यात जाण्यास सक्त मनाई असून, फ्लेमिंगो पक्ष्यांपासून सुरक्षित अंतर ठेवणे बंधनकारक आहे.

शांतता क्षेत्र : कोणत्याही प्रकारचे संगीत, वाद्य, लाऊडस्पीकर किंवा बँड वाजवण्यास पूर्ण बंदी आहे.

पक्ष्यांना खाद्य देण्यास मनाई : फ्लेमिंगो पक्ष्यांना खाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे खाद्यपदार्थ देण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.

शिकार व आग लावण्यास बंदी : वन्य प्राण्यांची शिकार करणे, तलावाच्या परिसरात आग लावणे, कचरा जाळणे किंवा फटाके फोडण्यास मनाई आहे.

कचरा टाकण्यास बंदी: पाण्यात कोणत्याही प्रकारची घाण, प्लास्टिक, कचरा किंवा निर्माल्य टाकल्यास कारवाई होईल.

# मतदार याद्या पुनरीक्षण कार्यक्रमाला सहकार्य करण्याचे नागरिकांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

निवडणुकीच्या मतदार याद्या अद्ययावत तसेच अधिक अचूक व पारदर्शक करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने मतदार याद्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत सन २०२४ च्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीमध्ये तयार करण्यात आलेल्या मतदार यादीतील मतदारांच्या नावाची सन २००२ मधील अंतिम मतदार यादीतील मतदारांच्या नावाशी ताळमेळ घालण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

**विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम काय आहे?**

मतदारांनी आपले नाव विद्यामान २०२४-२५ च्या मतदार यादीत असल्याची खातरजमा करून घेणे व सन २००२ मधील मतदार यादीतील नावाशी पडताळणी व जुळवणी करून घेणे.

सन २०२४-२५ मधील ज्या मतदारांची वयपूर्तता नसल्याने २००२ च्या मतदार यादीत नाव समाविष्ट नव्हते अशा मतदारांनी त्यांच्या नावाचे मॅपींग त्यांचे आई-वडील व वडीलांकडील आजी-आजोबा यांचे सन २००२ च्या यादीतील नावाशी करून घेणे.

ज्यांची नावे सन २००२ च्या मतदार यादीत नाही त्यांचेकडून प्रत्यक्ष SIR दरम्यान जन्माचे पुरावे घेणे

**मॅपिंग कशासाठी करावयाचे?**

याव्दारे भारतीय नागरिकत्वाची पडताळणी होणार असून मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची ही सर्वात महत्वाची अर्हता आहे.

नावाची पडताळणी व जुळवणी (Mapping) न केल्यास आपले नाव मतदार यादीत राहणार नाही.

याचा थेट परिणाम नागरिकत्वामुळे मिळणाऱ्या लाभांवर होईल.

मतदार यादीशी जोडून राहण्यासाठी सन २००२ मधील मतदार यादीत आपले स्वतःचे नाव असण्याचे अथवा नाव नसल्यास आपले आई-वडील किंवा आजी-आजोबा यांच्या नावाचे पुरावे सादर करणे, त्यांची पडताळणी करून घेणे ही प्रक्रिया करावी लागणार आहे. त्यामुळे मॅपींग करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे याची जाणीव ठेवून प्रत्येक नागरिकाने मॅपींग करून घेणे गरजेचे आहे.

या अनुषंगाने प्रत्येक मतदाराने २००२ च्या मतदार यादीतील आपले नाव व विद्यमान २०२४ च्या यादीतील आपले नाव याची पडताळणी व जुळवणी (Mapping) करून घ्यायची आहे.

**सुलभ मॅपींग प्रक्रिया**

मॅपींग प्रक्रियेत voter.eci.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी.

मग Search your Name in Last SIR हा पर्याय निवडून आपले नाव शोधावे.

जर २००२च्या मतदार यादीत आपले नाव सापडले, तर आपला विधानसभा क्रमांक, यादी भाग क्रमांक, यादीतील अनुक्रममांक ही माहिती आपल्याकडे नोंद करून ठेवावी.

## लबाड लांडगं ढाँग करतंय... उपोषण करायचं साँग करतंय!

# शिवकर ग्रामस्थांचा अनिल ढवळे यांच्या विरोधात मोर्चा

**अलिबाग : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील श्री गणपती देवस्थान ट्रस्ट या संस्थेच्या शिवकर येथील श्री गणपती इंग्लिश मीडियम स्कूल या शाळेविरोधात अनिल ढवळे यांनी सुरू केलेल्या उपोषणाचा निषेध करण्यासाठी शिवकर ग्रामस्थांनी सोमवारी (दि.२५) रायगड जिल्हा माध्यामिक शिक्षण अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता.



सोमवारी अलिबाग येथील क्रीडाभून मैदानात ग्रामस्थ जमले. तेथून मोर्चा सुरू झाला. लबाड लांडगं ढाँग करतंय...उपोषण करायचं साँग करतंय, अशा विविध घोषण देत शिवकर ग्रामस्थांचा मोर्चा अलिबाग पंचायत समिती कार्यालयाल असलेल्या माध्यमिक शिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयाजवळ आला. मोर्चा पोस्ट ऑफिसजवळ आला असाता पोलिसांनी अडवला. आम्हालादेखील माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयाजवळ जाऊ द्या, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी केली, परंतु पोलिसांनी ही मागणी तत्काळ अमान्य केली. शिवकर ग्रामस्थांनी अनिल ढवळे यांच्या विरोधात विविध घोषणा देत परिसर दणाणून सोडला होता. माध्यमिक शिक्षण अधिकारी महारूद्र नाळे आणि अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कोशोर साळे यांनी मोर्चेकऱ्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु मोर्चेकरी आपल्या मागणीवर ठाम राहिले.

श्री गणपती इंग्लिश मीडियम स्कूल शिवकर या संस्थेचे काम योग्य प्रकारे सुरू आहे. या शाळेत अनेक मुले शिक्षण घेत आहेत. अनिल ढवळे यांना ही शाळा बंद करायची आहे. ते लोकांची दिशाभूल करीत आहेत. प्रशासनाने अनिल ढवळे यांच्या दबावाखाली येऊन कोणतीही कारवाई करू नये. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होईल, अशी मागणी शिवकर ग्रामस्थांनी या वेळी केली.

शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, भाजपचे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, स्कूल कमिटीचे सेक्रेटरी चंद्रकांत ढवळे, स्कूल कमिटी अध्यक्ष गोटीराम ढवळे, संस्थापक लक्ष्मण सरपाटील आदी या मोर्चात सहभागी झाले होते.



# मान्सूनच्या सुरुवातीलाच डोलवली रस्त्याची दुरवस्था

**खोपोली : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील गावांना जोडणाऱ्या खालापूर तालुक्यातील डोलवली रस्त्याची मान्सूनच्या सुरुवातीलाच दयनीय अवस्था समोर आली असून मुसळधार पावसामुळे रस्ता चिखलमय झाला आहे. अनेक ठिकाणी मोठमोठी डबकी निर्माण झाल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



या ठिकाणी मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड वाहतूक होत असल्यामुळे याचाच फटका त्या रस्त्याला बसल्याचे समोर येत आहे.

स्थानिकांनुसार दुरुस्ती व नूतनीकरणाच्या कोणतेही काम करण्यात आले नाही. मान्सूनच्या सुरुवातीलाच रस्त्यांची ही अवस्था झाल्याने पुढील काळात समस्या गंभीर होण्याची शक्यता असून ग्रामपंचायतसह लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# मुरूडकरांना शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याची प्रतीक्षा

**मुरुड : प्रतिनिधी**

छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक मुरुडनगरीत मुरुड जंजिरा नगरपालिका परिषदेने श्री शिव छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळा उभारणेचा प्रस्ताव ८ ऑक्टोबर १९८५ रोजी झालेल्या सभेत संमत केला आहे. अश्वारूढ पुतळा कधी उभारणार, असा सवाल समाजमाध्यमांवरील मुरुडच्या ग्रुपवर जाहीररीत्या विचारला जात आहे.

मुरुड या पर्यटन नगरीत छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा व्हावा ही सर्वसामान्यांची जशी इच्छा आहे. तद्वतच मुरूड नगरपरिषदेची दिसते. मुरुड नगरपरिषदेतर्फे शिवपुतळ्याचे खर्चाचे बाबतीत कला संचालक मुंबई यांकडील पुतळ्यासंबंधी दिलेल्या सूचनांनुसार मार्गदर्शन मिळण्यासाठी कला संचालक मुंबई यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी मुरुड येथे येऊन संकल्पित पुतळ्याची मार्केटसमोरील जागा तसेच आणखी विश्रामबाग व सिद्धीबाग येथील जागा प्रत्यक्ष पाहून नगरपालिकेच्या पदाधिकऱ्यांशी विचारविनिमय केली. त्यांनी दिलेल्या सिद्धीबाग येथील जागेला अनुरूप अश्वारूढ पुतळा उभारणेस सभेने मान्यता दिली. ठराव संमत होऊन ३९ वर्षे उलटली तरी अश्वारूढ पुतळ्याचे स्वप्नच राहिले आहे.

मुरुड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी सांगितले की, आम्ही जनतेच्या मताशी पूर्णपणे सहमत आहोत. शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बाजारपेठेत होण्यासाठी नियमांचा अभ्यास करून योग्य पद्धतीने पाठपुरावा केला जाईल, असे यावेळी त्यांनी सांगितले.

# श्रीवर्धन जीवना, दांडा बंदरात नौका किनाऱ्यावर; मच्छीमारांची लगबग

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

अरबी समुद्रातील यंदाचा मच्छीमारी हंगाम आता अंतिम टप्प्यात आला असून १ जूनपासून लागू होणाऱ्या पावसाळी मासेमारी बंदीच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन आणि जीवना व दांडा बंदर परिसरात मच्छीमारांची लगबग सुरू झाली आहे. मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागताच मच्छीमारांनी आपल्या नौका समुद्रातून बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी लावण्यास सुरुवात केली आहे. यंदाचा हंगाम मच्छीमारांसाठी अपेक्षेप्रमाणे लाभदायक ठरला नसल्याची भावना स्थानिक मच्छीमारांनी व्यक्त केली. समुद्रात पापलेट, हलवा, घोळ यांसारख्या महागड्या मासळीचे प्रमाण कमी झाल्याने नौकांना अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. डिझेल दरवाढीमुळे मासेमारीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याने आर्थिक ताण अधिकच वाढला.

सध्या श्रीवर्धनमधील जीवना व दांडा बंदर परिसरात नौकांच्या दुरुस्तीची आणि सुरक्षिततेची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. नौका किनाऱ्यावर लावल्यानंतर त्यांच्या रंगरंगोटीपासून इंजिन दुरुस्तीपर्यंत विविध कामे केली जात आहेत. तसेच मासेमारीसाठी वापरण्यात येणाऱ्या जाळ्यांची विणकामे आणि दुरुस्तीही पावसाळ्यात केली जाणार आहे.

वादळी वाऱ्यांचा धोका लक्षात घेऊन नौका खाडीत किंवा सुरक्षित स्थळी लंगर टाकून बांधल्या जात आहेत. अनेक नौकांवर काम करणारे परराज्यातील खलाशीही आता आपल्या गावी परतण्याच्या तयारीत असल्याचे चित्र बंदरावर दिसत आहे.

हंगाम संपण्यास काहीच दिवस शिल्लक असताना खोल समुद्रात गेलेल्या काही नौकांकडून शेवटच्या टप्प्यात चांगली मासळी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेवटच्या काही दिवसांत बंपर मासळी मिळाल्यास यंदाच्या तोट्याची काही प्रमाणात भरपाई होईल, अशी आशा मच्छीमार बांधवांनी व्यक्त केली आहे.

मान्सूनपूर्व हवामानातील बदल व संभाव्य वादळांचा धोका लक्षात घेता मत्स्यव्यवसाय विभागाने मच्छीमारांना सतर्क राहण्याचे आवाहन केले. शासन नियमानुसार १ जूनपासून समुद्रात मासेमारीस बंदी लागू असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# सकल हिंदू समाज श्रीरामपूर आयोजित विराट हिंदू संमेलन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीरामपूर येथे ग्रुप ग्रामपंचायत निजामपूरच्या भव्य पटांगणावर शुक्रवार २२ मे रोजी सकल हिंदू समाज श्रीरामपूरच्या वतीने विराट हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात पद्मनाभ वारकरी संप्रदाय यांच्या दिंडी व हरिजागर व अभंगाने करण्यात आली. त्यांनतर पोवाडा, मर्दानी खेळ व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवराय, भारतमाता व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.




यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते निलेश भिसे पुणे व रोशन पडवळ यांचे हिंदू संमेलनाचे अध्यक्ष संजोग मानकर यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. याप्रसंगी नुकतेच भारतीय सैन्य दलातून लेफ्टनंट पदावरून सेवानिवृत्त झालेले श्रीरामपूरचे सुपुत्र लेफ्टनंट सुनील मारुती खामगावकर यांना शाल श्रीफळ व छत्रपती शिवरायांची प्रतिमा देऊन गौरविण्यात आले. तसेच डॉ. अभिजीत पाटसकर व श्रीरंग अभिजित पाटसकर, कु. शार्दुल अभिजित पाटसकर याने वयाच्या ११ व्या वर्षी बलूनी टॉप हे समुद्रसपाटीपासून १२५१३ फूट उंचीचे शिखर सर करून तिथे भारतीय तिरंगा फडकावल्याबद्दल त्यांना शाल, श्रीफळ व शिवरायांची प्रतिमा देऊन गौरविण्यात आले.

हिंदू संमेलनाचे अध्यक्ष संजोग एकनाथ मानकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. रोशन पडवळ यांनी आपल्या ओघवत्या वाणीमध्ये संघ विचार व संघाचा विस्तार कसा झाला याबाबत तसेच पंच परिवर्तन याबाबत अतिशय उत्तम मार्गदर्शन केले व समाजामध्ये संघ विचारांची का आवश्यकता आहे याबाबतही विवेचन केले. त्यानंतर कार्यक्रमाचे मुख्य वक्ते निलेश भिसे यांनी हिंदू धर्मावर वेगवेगळ्या प्रकारांनी कशी आक्रमणे केली जात आहेत व हिंदूंमध्ये जातीपातीच्या भिंती उभारून कशी फूट पाडली जात आहे, हिंदू माता भगिनींची कशा प्रकारे फसवणूक केली जात आहे व हिंदू कुटुंब व्यवस्था उद्ध्वस्त करण्याचे षड्यंत्र कसे रचले जात आहे याबाबत आपले अतिशय मार्मिक विचार मांडले.

कार्यक्रमाच्या शेवटी मानसी जोशी व मृण्मयी जोशी यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमानंतर उपस्थितांना स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र चांगण यांनी केले. या हिंदू संमेलनाला श्रीरामपूर पंचक्रोशीतून तन, मन व धनाने उदंड असा प्रतिसाद लाभला व अवकाळी पावसाला न जुमानता सर्व हिंदू मोठ्या संख्येने उपस्थित राहिले व विराट हिंदू संमेलन उत्साहात आणि अगदी आनंदात पार पडले.

# दीपक फाउंडेशनच्या सक्रिय सहभागातून पाणलोट बंधाऱ्यांची उभारणी; परिसर होणार पाणीदार, सहकार्याबद्दल ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त

**धाटाव : प्रतिनिधी**

कृषी, आरोग्य, शैक्षणिक क्षेत्र यांसह शासकीय योजना लोकांपर्यंत पोहोचवून कृतीशील उपक्रम राबवणाऱ्या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याची दीपक नायट्रेट कंपनी संचालीत दीपक फाउंडेशनच्या माध्यमातून ठिकठिकाणी पाणलोट बंधाऱ्यांची उभारणी केली जात आहे. वरसे ग्रा.पं.च्या निवी गाव हद्दीत लोकसहभागातून नैसर्गिक पाणी स्त्रोत ओहळांवर तब्बल ५ ठिकाणी पक्के बांधकामाचे पाटलोट बंधाऱ्यांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.



ओहळांवर पाणलोट बंधारे बांधले जाणार असल्याने सबंध परिसर अक्षरशः पाणीदार होणार, जमिनीत पाण्याचे मूल स्त्रोत पुनर्जीवीत होणार असल्याने दीपक फाउंडेशनच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दरम्यान, परिसरातील जमिनीत पाणी साठा कायम जीवित राहावे, परिसर सुजलाम् सुफलाम् व्हावे हेच उद्देश पाणलोट बंधारे बांधण्यामागील आहे. पाणी स्त्रोताचा शेतकऱ्यांना फायदा होईल अशी भावना प्रकल्प समन्वयक अनिकेत निकम यांनी दिली तर निवी हद्दीतील नैसर्गिक ओहळावर पाणी आडवा, पाणी जिरवा भावनेतून दीपक फाउंडेशन ठिकठिकाणी बंधारे बांधणीची उभारणी करत आहे. याचे आम्हा ग्रामस्थांना निश्चित समाधान आहे. लोकसहभागातून पाण्याची समृद्धी सुखावणारी आहे, अशी प्रतिक्रिया माजी सरपंच अमित मोहिते यांनी व्यक्त केली.

दीपक नायट्रेट संचालीत दीपक फाउंडेशनच्या माध्यमातून निवी, तळाघर सर्व परिसरात आरोग्य, शैक्षणिक, कृषी उपक्रम, मार्गदर्शन शिबीरे, कृषी योजनांची कृतीशील माहिती देण्यात दीपक फाउंडेशन अग्रस्थानी आहे. रोहा तालुक्यातील अनेक गावे वाडी वस्त्यांवर विविध सेवा पुरविली जाते.

शेतकऱ्यांना पूरक साहित्य, बी बियाणे, शासकीय योजनांची माहिती देण्यात नेहमीच पुढाकार राहिला आहे. शाळांत विविध उपक्रम साहित्यदेखील दिले गेले आहेत.

## किल्ले रायगडावर राज्याभिषेक सोहळ्याची जय्यत तयारी सुरू

**माणगाव :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त ६ जून रोजी रायगड किल्ला येथे भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार असून त्यासाठी प्रशासन आणि विविध शिवप्रेमी संस्थांकडून जोरदार तयारी सुरू असल्याची माहिती शिवप्रेमी भूषण शिसोदे यांनी प्रसारमाध्यमांना दिली. राज्याभिषेक दिनानिमित्त किल्ल्यावर स्वच्छता मोहीम, सजावट, रोषणाई तसेच भाविक आणि पर्यटकांसाठी आवश्यक सुविधांची उभारणी करण्यात येत आहे. गडावरील प्रमुख मार्गांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सुरक्षा बंदोबस्त आणि वैद्यकीय सुविधा यांवर विशेष भर देण्यात आला आहे.



**मुरूड : १ जूनपासून मासेमारी दोन महिन्यांसाठी बंद होणार असल्याने राजपुरी येथील कोळी बांधवांनी आपल्या बोटी पारंपरिक पद्धतीने ओढून किनारी शाकारण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.**

# रोहा तालुक्यामध्ये पोलीस मित्र संघटनेचा मार्गदर्शन कार्यक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यात पोलीस मित्र संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेला मार्गदर्शन कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्य विभाग व रायगड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय विश्रामगृह, रोहा येथे कार्यक्रम झाला. आयोजन पोलीस मित्र संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संतोष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.



प्रमुख मार्गदर्शक राष्ट्रीय जनसंपर्क प्रमुख जी. एम. भगत यांनी उपस्थितांना संघटनेच्या कार्याची माहिती दिली. त्यांनी सांगितले, पोलीस मित्र संघटनेची स्थापना ११ मार्च २०११ रोजी झाल. आज संघटना भारतभर कार्यरत आहे. महाराष्ट्रात विविध सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबवले जात आहेत.

जी. एम. भगत यांनी सांगितले की, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांना सर्वतोपरी मदत करणे संघटनेचे मुख्य ध्येय आणि उद्दिष्ट आहे. रक्तदान शिबिरे, वृक्षलागवड, अनाथाश्रम व वृद्धाश्रम येथे सेवाकार्य, विविध उपक्रमांद्वारे समाजसेवेचे कार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान रायगड जिल्हाध्यक्षपदी हरिचंद्र वाजंत्री, रायगड महिला जिल्हाध्यक्षपदी सुनंदा मोहिते, उपजिल्हाध्यक्षपरी मंगेश पालांडे तसेच महिला जिल्हाध्यक्षपदी सुप्रिया पाशिलकर यांची निवड करण्यात आली.

यावेळी जी. एम. भगत, रेवती कदम, कृष्णकांत पाटील, वर्षा सहस्त्रबुध्ये, अनिल पोटफोडे, संजय करंजे, मंदा ठाकूर, वर्षा जांबेकर (रायगड जिल्हा महिला सचिव) यांच्यासह रायगड जिल्ह्यातील महिला व पुरुष पदाधिकारी, रोहा तालुक्यातील सदस्य आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून समाजहितासाठी पोलीस मित्र संघटना करीत असलेल्या कार्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

# आयपीएल प्लेऑफच्या लढती निश्चित

**मुंबई : प्रतिनिधी**




आयपीएल २०२६च्या प्लेऑफमध्ये पोहचलेल्या चार संघांची नावे अखेर निश्चित झाली आहेत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, गुजरात टायटन्स, सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांनी प्लेऑफमध्ये स्थान मिळवले आहे. राजस्थान रॉयल्सने शेवटच्या लीग सामन्यात मुंबई इंडियन्सचा पराभव करत चौथ्या स्थानावर कब्जा केला.

आयपीएल गुणतालिकेतील अव्वल दोन संघांमध्ये क्वालिफायर १ रंगणार आहे. विद्यमान विजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघ गुजरात टायटन्स संघाविरुद्ध मैदानात उतरणार आहे. हा सामना २६ मे रोजी धर्मशाला येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियममध्ये होणार आहे. सामना संध्याकाळी ७.३० वाजता सुरू होईल. या सामन्याचा विजेता थेट अंतिम फेरीत प्रवेश करेल, तर पराभूत संघाला क्वालिफायर २मध्ये आणखी एक संधी मिळेल.

सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात एलिमिनेटर सामना खेळला जाणार आहे. या सामन्यात पराभूत होणाऱ्या संघाचा स्पर्धेतील प्रवास संपणार आहे. हा सामना २७ मे रोजी मुल्लांपूर, न्यू चंदीगड येथील महाराजा यादविंद्र सिंह आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियममध्ये होईल. सामन्याची वेळ संध्याकाळी ७.३० वाजता आहे. या सामन्याचा विजेता क्वालिफायर २मध्ये खेळेल, जिथे त्याचा सामना क्वालिफायर १मधील पराभूत संघाशी होईल.

क्वालिफायर २ सामना २९ मे रोजी न्यू चंदीगडमधील याच मैदानावर होणार आहे. या सामन्याचा विजेता अंतिम फेरीत पोहचेल, तर आयपीएलची बहुप्रतिक्षित फायनल ३१ मे रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये रंगणार आहे.

आता क्रिकेट चाहत्यांचे लक्ष प्लेऑफ सामन्यांकडे लागले असून कोणता संघ अंतिम फेरीत पोहचणार आणि ट्रॉफी जिंकणार याबाबत उत्सुकता वाढली आहे.

**असे रंगणार प्लेऑफचे सामने**

**२६ मे** : आरसीबी वि. गुजरात (क्वालिफायर-१), सायं. ७.३० वा., धर्मशाला

**२७ मे :** राजस्थान वि. हैदराबाद (एलिमिनेटर), सायं. ७.३० वा., चंदीगढ

**२९ मे :** दुसरी क्वॉलिफायर, सायं. ७.३० वा., चंदीगढ

**३१ मे :** फायनल, सायं. ७.३० वा, अहमदाबाद

# कबड्डी स्पर्धेत देऊळवाडी संघाने पटकाविले विजेतेपद

**कर्जत : प्रतिनिधी**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कर्जत-खालापूर तालुका मर्यादित कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील अंतिम सामन्यात भैरवनाथ देऊळवाडी संघाने नवकुमार मुद्रे संघाचा पराभव करीत अजिंक्यपद पटकाविले.



कर्जत येथील पोलीस मैदानावर झालेल्या या स्पर्धेत एकूण ३२ संघांनी सहभाग घेतला होता. विशेष म्हणजे ही स्पर्धा पहाटे पाच वाजेपर्यंत रंगली. तृतीय क्रमांक भैरवनाथ संघ हलिवली, तर चतुर्थ क्रमांक नवतरुण संघ मुद्रे (खुर्द) यांनी मिळविला.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून सुयोग गायकर (देऊळवाडी) याला गौरविण्यात आले. उत्कृष्ट चढाई प्रशांत जाधव (हलिवली), उत्कृष्ट पकड नवतरुण वैभव मोरे (मुद्रे खुर्द) आणि पब्लिक हिरो म्हणून धीरज बैलमारे (मुद्रे) यांना सन्मानित करण्यात आले. स्पर्धेचे सूत्रसंचालन समीर सोमणे आणि यांनी केले.

स्पर्धेच्या आदल्या दिवशी संध्यकाळी धुवांधार पाऊस पडल्याने स्पर्धा होईल की नाही? अशी परिस्थिती निर्माण झाली होती, पण अतुल कडू आणि महेश लोट यांनी मैदान सुस्थितीत आणण्यासाठी दिवसभर मेहनत घेतली. त्यामुळे या दोघांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# रोह्याच्या अनुराज ठाकूरची रायगड जिल्हा कुमार गट खो-खो संघात निवड

**धाटाव : प्रतिनिधी**

पनवेल येथे नुकत्याच पार पडलेल्या रायगड जिल्हा कुमार गट खो-खो निवड चाचणी स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्याने जय बजरंग रोहा खो-खो संघाचा अनुराज योगेश ठाकूर याची सोलापूर येथे होणाऱ्या पाचव्या महाराष्ट्र राज्य कुमार गट अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कुमार गट संघात निवड करण्यात आली आहे.



विशेष म्हणजे, अनुराजची सलग दुसऱ्या वर्षी रायगड जिल्हा संघात निवड झाली असून मागील वर्षीदेखील त्याने रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले होते. सातत्यपूर्ण सराव, मेहनत, फिटनेस व उत्कृष्ट खेळाच्या जोरावर त्याने जिल्हा संघात आपले स्थान कायम राखले आहे.

जय बजरंग रोहा खो-खो संघाच्या माध्यमातून अनुराजने अनेक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याच्या या निवडीबद्दल जय बजरंग क्रीडा मंडळ रोहा तसेच परिसरातील क्रीडाप्रेमींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# मुंबई महापौर पॉवरलिफ्टिंग स्पर्धा उत्साहात; खेळाडूंचा प्रतिसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महानगरपालिकेच्या सौजन्याने आणि मुंबई शहर पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने नुकतीच मुंबई महापौर चषक पॉवरलिफ्टिंग स्पर्धा दादर येथील किर्ती कॉलेजमध्ये झाली. या स्पर्धेत एकूण १४७ स्पर्धकांचा सहभाग होता. यामध्ये महिला ४७ आणि १०० पुरुषांनी विविध गटात भाग घेतला.




या स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास अ‍ॅड.नील हेळेकर (विश्वस्त, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे), शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त संजय सरदेसाई (सरचिटणीस, महाराष्ट्र स्टेट पॉवरलिफ्टिंग असोसिएशन), अनिल मार्तंड,(प्राचार्य, किर्ती कॉलेज), शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त संजय माधव (सहचिटणीस), दिलीप केळुसकर (दादोजी कोंडदेव पुरस्कार विजेते), शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त महेश पेडामकर (अध्यक्ष, मुंबई शहर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन), जिल्हा क्रीडा पुरस्कार विजेते समीर दळवी (सचिव, मुंबई शहर पॉवरलिफ्टिंग असोसिएशन) आदी उपस्थित होते. या स्पर्धेच्या अनुषंगाने शिवछत्रपती पुरस्कार, दादोजी कोंडदेव पुरस्कार आणि जिल्हा क्रीडा पुरस्कार प्राप्त झालेल्या आजी-माजी १४७ खेळाडू, प्रशिक्षक यांना गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला मुंबईच्या महापौर रितू तावडे उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी भाषणामध्ये सांगितले की, बृहन्मुंबई महापालिका ही केवळ नागरी सुविधा देणारी संस्था नाही, तर मुंबईकरांच्या स्वप्नांना आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना व्यासपीठ देणारी आहे. मुंबईचा खेळाडू ऑलिम्पिकच्या व्यासपीठावर देशाच्या तिरंगा फडकवेल तो दिवस दूर नाही आणि त्यासाठी महापालिका तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील.

मुंबई शहर पॉवरलिफ्टिंग असोसिएशनने अत्यंत नेटके आणि शिस्तबद्ध आयोजन केले. त्याचबरोबर बक्षीस स्वीकारताना रुबी दास, (स्ट्राँग वूमन ऑफ इंडिया) यांनी खेळाडूचा रुबाब दाखवला, त्याबद्दल महापौर तावडे यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

**किताब विजेते**

पुरुष गट : सब ज्युनिअर स्ट्राँग बॉय-आयर्न मॅटर (मुंबई शहर), ज्युनियर स्ट्राँग बॉय-विराज पावसकर (उपनगर मुंबई), सीनियर स्ट्राँग मॅन-योगेश गुंड (मुंबई शहर), मास्टर स्ट्राँग मॅन-राजेश शेटे (मुंबई शहर).

महिला गट : सब ज्युनिअर गर्ल-सेजल बेलवलकर (मुंबई उपनगर), ज्युनिअर स्ट्राँग गर्ल-तन्वी शिंदे (मुंबई शहर), सीनियर स्ट्राँग वूमन-सेजल मकवाना (मुंबई उपनगर), मास्टर स्ट्राँग वूमन-रुबी दास (मुंबई शहर).

# दिल्लीचा शेवट गोड! कोलकाताला नमवले



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेतील साखळी फेरीतील शेवटचा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. दोन्ही संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले होते, त्यामुळे या सामन्याच्या निकालाचा गुणतालिकेवर फरक पडणार नव्हता. पण तरीदेखील दोन्ही संघांनी विजय मिळवण्यासाठी पूर्ण जोर लावला. यामध्ये दिल्लीने बाजी मारली.

ईडन गार्डन्सच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २०३ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाला १६३ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह दिल्लीने हा सामना ४० धावांनी खिशात घातला.

मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना कोलकाताला जशी सुरुवात हवी होती, जी कर्णधार अजिंक्य रहाणेने करून दिली. त्याने ३९ चेंडूत चार चौकार आणि चार षटकारांचा साहाय्याने ६३ धावांची खेळी केली, तर फिन अ‍ॅलेनने २० धावा केल्या. मनीष पांडे २५ धावा करून माघारी परतला. कॅमेरून ग्रीन अवघ्या दोन धावा करून बाद झाला, तर रिंकू सिंग गोल्डन डकवर माघारी परतला. कोलकाताचा डाव १६३ धावांवर आटोपला.

तत्पूर्वी कोलकाताने नाणेफेक जिंकून दिल्लीला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. दिल्लीकडून अभिषेक पोरेल आणि केएल राहुलची जोडीने संघाला दमदार सुरुवात करून दिली. अभिषेकने २२ धावा, तर केएल राहुलने ६० धावा केल्या. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या साहिल पारेखने २४ धावा केल्या. कर्णधार अक्षर पटेलने ३९ धावा चोपल्या. शेवटी डेव्हिड मिलरने २८ धावा आणि आशुतोष शर्माने नाबाद १८ धावा केल्या. यासह दिल्ली कॅपिटल्सने २० षटकांअखेर पाच गडी बाद २०३ धावा केल्या होत्या.

## मुंबईविरुद्ध फ्लॉप ठरूनही वैभवने रचला इतिहास

### एका टी-२० स्पर्धेत केल्या सर्वाधिक धावा

**मुंबई : प्रतिनिधी**

राजस्थान रॉयल्सच्या रविवारी मुंबई इंडियन्सविरुद्धच्या 'करा किंवा मरो' अशा सामन्यात सर्वांचे लक्ष वेधले होते युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीच्या फलंदाजीकडे. चाहत्यांना उत्तुंग षटकार, चौकारांची आतषबाजीसह त्याच्याकडून अर्धशतक किंवा शतकाची अपेक्षा होती, मात्र वैभव सहा चेंडूत अवघ्या चार धावांवर बाद झाला. या निराशाजनक कामगिरीनंतरही सूर्यवंशीने टी-२० क्रिकेटमध्ये इतिहास रचला आहे.

मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यापूर्वी यंदाच्या आयपीएल हंगामात वैभव सूर्यवंशीच्या नावावर ५७९ धावा होत्या. या सामन्यानंतर आयपीएलच्या यंदाच्या हंगामातील त्याची एकूण धावसंख्या ५८३वर पोहचली. वैभव हा आता कोणत्याही एका टी-२० स्पर्धेत किंवा मालिकेत सर्वाधिक धावा करणारा जगातील पहिला युवा खेळाडू ठरला आहे. त्याने देवदत्त पडिक्कलचा विक्रम मोडीत काढला आहे. देवदत्तने २०१९-२०च्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीदरम्यान कर्नाटककडून खेळताना एका हंगामात ५८० धावा केल्या होत्या.

# राजस्थानच्या विजयात जोफ्रा आर्चरचे अष्टपैलू योगदान

**मुंबई : प्रतिनिधी**

वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने मुंबई इंडियन्सचा ३० धावांनी पराभव करत या विजयासह यंदाच्या आयपीएल हंगामातील प्ले-ऑफचे चौथे आणि शेवटचे तिकीट निश्चित केले. आर्चरने आधी फलंदाजीत अवघ्या १५ चेंडूंत ३२ धावांची वादळी खेळी केली आणि नंतर गोलंदाजीत आपल्या चार षटकांच्या कोट्यात अवघ्या १७ धावा देत तीन महत्त्वपूर्ण बळी टिपले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना राजस्थान रॉयल्सने निर्धारित २० षटकांत ८ बाद २०५ धावांचा डोंगर उभा केला. मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनी शेवटच्या पाच षटकांत केलेला स्वैर मारा राजस्थानच्या पथ्यावर पडला. आर्चरच्या १५ चेंडूंतील ३२ धावांच्या उपयुक्त खेळीमुळे राजस्थानला दोनशेपार मजल मारता आली.

२०६ धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. 'पॉवर प्ले'च्या पहिल्या सहा षटकांत



मुंबईने अवघ्या ४९ धावांत चार बडे फलंदाज गमावले आणि इथेच सामन्याचे चित्र जवळपास निश्चित झाले. आर्चरने रोहित शर्माला (०) चकवा देत पहिले यश मिळवले व नंतर पाठोपाठ तिसऱ्या षटकात नमन धीरचा (६) त्रिफळा उडवला. त्यानंतर नांद्रे बर्गरने रायन रिकल्टनला (१२) वैभव सूर्यवंशीकरवी झेलबाद करून मुंबईचे कंबरडेच मोडले. खराब फॉर्मशी झगडत असलेल्या तिलक वर्माला ब्रिजेश शर्माने पायचीत केले. त्यामुळे मुंबईची अवस्था चार बाद ३८ अशी बिकट झाली.

या बिकट परिस्थितीतून सूर्यकुमार यादव आणि विल जॅक्स यांनी मुंबईचा डाव सावरला. दोघांनी पाचव्या गड्यासाठी ६३ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. यादरम्यान राजस्थानच्या ब्रिजेश शर्माने सुमार क्षेत्ररक्षण केले. जीवदानाचा फायदा घेत सूर्यकुमारने ४२ चेंडूंत ६० धावांची (चार षटकार, तीन चौकार) अर्धशतकी खेळी केली, तर विल जॅक्सने १८ चेंडूंत ३३ धावांचे योगदान दिले. शेवटच्या ३० चेंडूंत मुंबईला ५९ धावांची गरज होती आणि हार्दिक पांड्या १५ चेंडूंत ३४ धावा करून क्रीजवर होता. १६ वे षटक टाकण्यासाठी आलेल्या जोफ्रा आर्चरविरुद्ध संयम राखण्याऐवजी हार्दिकने आक्रमक फटका मारण्याचा प्रयत्न केला. यातच तो बाद झाल्याने मुंबईच्या विजयाच्या आशा पूर्णपणे मावळल्या.

प्रारंभी फलंदाजांच्या सांघिक कामगिरीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सने प्रारंभी निर्धारित २० षटकांत ८ बाद २०५ अशी मजबूत धावसंख्या उभारली. आघाडी फळी गडगडली असली तरी राजस्थानने अखेरच्या षटकांमध्ये तुफानी फलंदाजी करत २०० धावांचा टप्पा पार केला. जोफ्रा आर्चरने अवघ्या १५ चेंडूंत ३२ धावांची आक्रमक खेळी साकारली, तर रवींद्र जडेजा (नाबाद १९) आणि नांद्रे बर्गर (नाबाद १०) यांनी संघाला आव्हानात्मक धावसंख्येपर्यंत पोहचवले.

# फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत जोकोविचची विजयी सलामी



**पॅरिस : वृत्तसंस्था**

सर्बियाचा स्टार टेनिसपटू नोव्हाक जोकोविच याने फ्रेंच ओपन स्पर्धेत विजयी सलामी देत आपल्या विक्रमी २५व्या ग्रँडस्लॅम विजेतेपदाच्या मोहिमेला शानदार सुरुवात केली. पॅरिसमधील रोलाँ गॅरोस कोर्टवर झालेल्या पहिल्या फेरीच्या सामन्यात जोकोविचने फ्रान्सच्या जिओव्हानी म्पेत्शी पेरिकार्ड याचा ५-७, ७-५, ६-१, ६-४ असा पराभव केला.

सामन्याच्या सुरुवातीला सर्बियन स्टारला कडवी झुंज द्यावी लागली. घरच्या प्रेक्षकांच्या जोरदार पाठिंब्यावर खेळणाऱ्या जिओव्हानीने पहिल्याच सेटमध्ये आक्रमक खेळ करत जोकोविचला दबावाखाली ठेवले. त्यामुळे सुरुवातीला या सामन्यात मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती, मात्र अनुभवी जोकोविचने दुसऱ्या सेटपासून आपला खरा खेळ दाखवायला सुरुवात केली.

सामन्यानंतर बोलताना जोकोविचने प्रतिस्पर्ध्याचे कौतुक केले. तो म्हणाला, जिओव्हानीविरुद्ध मी पहिल्यांदाच खेळत होतो. त्याची सर्व्हिस ओळखणे खूप कठीण होते. माझ्या कारकिर्दीत फार कमी खेळाडूंमध्ये अशी ताकद आणि वेग पाहायला मिळाला आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com